म. ग्रं. सं. ठाणे
विषय २-प्रवास
क्र. नं. २०
१२३९

# म्हैसूरची सफर.

[illegible]श्वर गोपाळ काळे.



REFBK-0004570

गिरसप्पाचा धबधबा.

किंमत ४ आणे.

सं.प्रवाग
१-११-३१

# आमची म्हैसूरची सफर.

लेखकः—

**श्रीयुत मोरेश्वर गोपाळ काळे.**

माझा काश्मिरचा प्रवास ह्या पुस्तकाचा कर्ता—

शिक्षक, नूतन मराठी विद्यालय हायस्कूल पुणें.

४५७०

मुद्रक व प्रकाशकः—

**रा. रा. शंकर नरहर जोशी**

चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें.

REFBK-0004570

सन १९३१.

**किंमत ४ आणे.**

अमेरिकापथदर्शक, राजर्षि भीष्म,

मानवी अधिकार, हिंदुसंघटन

इ० अभिनव ग्रंथमाला.

नागपूर येथील सर्व पुस्तकें व इतर सर्व प्रकारचीं

पुस्तकें मिळण्याचें एकच ठिकाण.

व्यापाऱ्यांस व वाचनालयांस भरपूर कमिशन.

मो. गो. काळे.

३८२ शनिवार पेठ, पुणें.

प्र. ५८२ ११२
९-११-३९

# प्रास्ताविक.

आपल्या देशांत अत्यंत श्रीमंत किंवा अत्यंत गरीब अशीं दोन प्रकारचीं माणसेंच अखंड प्रवास करीत असतात पण दोघांनाहि प्रवासी म्हणणें कठीण. श्रीमंतांची प्रवाशी दृष्टी निराळीं असते. नेहमीच्या त्रासदायक व्यवसायांतून तात्पुरती विश्रांती मिळावी किंवा मनरंजन व्हावें म्हणून केवळ चैनीकरितां हा वर्ग प्रवासी बनतो. दुसरा प्रवासी वर्ग साधु संन्याशी वगैरे भिक्षेकऱ्यांचा हा वर्ग अखंड पर्यटन करतो. पूर्वींच्या साधुसंतांनीं करून ठेविलेल्या पुण्याईमुळें या वर्गालाहि कशाची कमतरता भासत नाहीं. हा संन्याशांचा तांडा **हिमालयापासून रामेश्वरापर्यंत** भटकत असतो. या भटकण्यांत तीर्थयात्रा करणें हें ध्येय नसतें किंवा परमेश्वरप्राप्तीचें ध्येय नसतें. **हिंदुस्थानांतील** एक कोट भिक्षेकरी अशी सतत पर्यटणें करून आपलें उदरभरण करीत असतात. या दुसऱ्या वर्गाला प्रवासी म्हणणें सुद्धां कठीण, कारण यांची दृष्टी प्रवासाची नसते. पहिला श्रीमंतांचा वर्गाहि प्रवासी दृष्टीनें प्रवास करीत नसतो.

पाश्चात्त्य देशांत प्रवास करण्याला जें एक महत्त्व आहे व जो अर्थ आहे तो अद्याप आपल्या देशांत नाहीं. कुठला कानडाचा प्रवासी अगर आस्ट्रेलियाचा प्रवासी पण तो हिमालय कसा आहे, किंवा उत्तर ध्रुवावर काय आहे, अथवा अजिंठ्याचीं लेणीं कशी आहेत अगर सांचीचे स्तूप कसे आहेत अथवा मोहांजादारोमध्यें काय शोध लागले आहेत किंवा ताज कसा दिसतो हें पहाण्याकरितां अत्यंत कष्टप्रदच काय पण कित्येक वेळां प्राणघातक असे प्रवास करीत असतो. तेथील मुलांना लहानपणापासूनच प्रवासाचें बाळकडू पाजलें जाते. सुटीच्या दिवसांत झुंडीच्या झुंडी बाहेरगांवीं प्रवासाला जात असतात. प्रवास करणेंही आपल्याकडे चैनीची बाब जशी समजली जाते तशी तिकडे समजली जात नाहीं. आमच्याकडे प्रवास न करण्याला पैशाचा अभाव हें कारण नसून अद्याप प्रवाशी वृत्ती बनली नाहीं हेंच खरें कारण आहे. दरवर्षी आमचे देशांत हजारों पाश्चात्त्य प्रवासी येऊन जातात व **काश्मीरसारखे** नंदनवन पाहून जातात. पण आमच्या श्रीमंताजवळ पैसा असला किंवा सवड असली तरी ते काश्मीरकडे जाणार नाहींत व आपलें घर सोडणार नाहींत.

खरी अडचण प्रवासाची हौस असणाऱ्या पण जवळ पैसा नसणाऱ्यांची. त्यांतील दुसरा भाग म्हणजे पैशाचा अभाव हा प्रवासाच्या हौशीआड कसा येत नाहीं हें **श्री. काळे** यांनीं उत्तम प्रकारें आपल्या प्रवासांनीं सिद्ध केलें आहे. थोडक्या पैशांत इच्छा असल्यावर प्रवास कसा करतां येतो हें त्यांनीं आपल्या **नेपाळच्या** व **काश्मीरच्या** प्रवासांनीं दाखवून दिलें आहे **श्री. काळे** यांनीं हा जो प्रवास केला तो हवा पालटण्याकरितां किंवा देशपर्यटनाकरितां केला नसून शिक्षणाकरितां व अनुभवाकरितां केला. **बेकन** हा एक मोठा निबंधकार होऊन गेला. त्यानें प्रवाशांनीं नव्या ठिकाणीं काय काय पहावें याचें एक उत्कृष्ट टिपण दिलें आहे. तो म्हणतो " प्रवाशांनीं राजदरबार, न्यायालयें, देवालयें, स्मारकें, गांवाचे तट, बंदरें व गोद्या, उध्वस्त भाग व जुन्या वस्तू, वाचनमंदिरें, कॉलेजें, व्याख्यानें व वादविवाद, आरमार व नौका, घरें, सरकारी व खासगी क्रीडोद्यानें, शस्त्रागारें, दारुगोळ्याचीं ठिकाणें, द्रव्याच्या उलाढालीचीं ठिकाणें, बाजार, शिपायांच्या कवायती, नाटकें, जवाहीरखाने इत्यादि पहावें. याखेरीज लग्न, अंत्यविधी, फांशीची शिक्षा, मेजवान्या, वगैरेहि पहाव्या. ज्या ठिकाणीं जावयाचे तेथील थोडीशी भाषा यावी, बरोबर तेथील वाटाड्या घ्यावा व त्या गांवाच्या माहितीचें पुस्तक जवळ असावें. त्यानें एका गांवांत फार दिवस राहूं नये व राहिलेच तर वारंवार घरें बदलावीं. त्यानीं त्या त्या गांवच्या प्रसिद्ध व्यक्तींच्या गांठी घ्याव्या व त्यांच्या जीवनक्रमाशीं त्यांची कीर्ति ताडून पहावी. त्यानीं रोजनिशी ठेवावी. पण परत प्रवास करून आल्यानंतर आपल्या पोषाखांत अगर वागणुकींत फरक करूं नये. " बेकनच्या वेळेपेक्षां हल्लीं प्रत्येक गांवांत बरेंच पहाण्यासारखें असतें; त्याचप्रमाणें साधनेंहि वाढलीं आहेत. आज प्रवासाच्या स्मृतीचें फोटोग्राफ हें उत्कृष्ट साधन झालें आहे. पण साधनें वाढलीं असलीं तरी प्रवाशानें प्रवास करतांना जी सूक्ष्म दृष्टी ठेवावयाची ती बदलली नाहीं. **श्री. काळे** हे या दृष्टीनेंच प्रवास करीत असतात हें त्यांचें प्रस्तुतचें प्रवासवर्णन वाचून खात्री होईल.

प्रवासामुळें ज्ञानांत तर भर पडतेंच; पण आपल्या विशिष्ट गांवीं राहून दृष्टीला जो आकुंचितपणा आलेला असतो व आपण सर्वश्रेष्ठ ही जी भावना असते ती नाहींशी होते. पाश्चात्यराष्ट्रांतील लोकांमध्यें धाडस व प्रवासाची आवड हे गुण असल्यामुळें ते पुष्कळ गोष्टी शिकले, किंबहुना त्यांच्या साऱ्या ऐश्वर्याचा

उगम या प्रवाशी वृत्तींत आहे असें दिसून येतें. तेव्हां पूर्वीच्या कल्पना आपण टाकून देऊन प्रवाशी वृत्तीचे बनलें पाहिजे. दुसऱ्यांनीं लिहिलेली प्रवासवर्णनेंही जिज्ञासा उत्पन्न करूं शकतात, ती तृप्त करूं शकत नाहींत. म्हैसूरचें प्रवासवर्णन वाचून आतां म्हैसूरला जाण्याचें कारण नाहीं असें वाटणारा वाचक अगदींच निरुपयोगी. प्रवासवर्णनें अशीं असावीत कीं, तीं वाचलीं असतां आपण तेथें कधीं जाऊं अशी उत्सुकता वाटली पाहिजे. **श्री. काळे** यांचें हें प्रवासवर्णन उत्सुकता उत्पन्न करणारें आहे असें दिसून येतें. तेव्हां **श्री. काळे** हे करीत असलेल्या कष्टप्रद प्रवासांचें चीज जर आपण प्रवास करूं लागलों तरच खरें होणार आहे. त्यांच्या अनुभवावरून इच्छा असली म्हणजे मार्ग कसा सांपडतो हें उत्तमपणें समजून येते. तेव्हां वाचकांनीं त्यांच्या लिहिण्याचें सार्थक त्यांच्याप्रमाणें बनून करावें अशी प्रार्थना करून हे प्रास्ताविक चार शब्द पुरे करतो.

पुणें ता.
३१।८।३१

**त्र्यं. र. देवगिरीकर.**
संपादक चित्रमयजगत् पुणें.

# पुस्तककर्त्याचे चार शब्द.

१९२९ सालीं काश्मीरचा प्रवास केला व त्याचें पुस्तक १९३८ सालीं प्रसिद्ध केलें. काश्मीरचा प्रवास करून आल्यानंतर भिवंडीस गेल्यावेळीं तेथील प्रवासप्रिय वकील श्री. नानासाहेब जोग ह्यांची गाठ पडली तेव्हां ते म्हणाले. " काश्मीरला जाण्यापूर्वी मजला कां सांगितलें॰ नाहीं मी तुमच्याबरोबर आलों असतों. " मी त्यांस म्हणालों " तुमचें व माझें कसें जमलें असतें ? मी गरीब मनुष्य पायीं प्रवास करणार तुम्ही मोटारींतून जाणार. म्हणून तुम्हांस कळविलें नाहीं." ते म्हणाले—आपण दोघेही मोटारनें गेलों असतों मी तुमचा सर्व खर्च केला असता मजला सोबतीची जरूर होती. तेव्हां मी त्यांस पुढें तुम्हांस कोठेंही जाणें असल्यास मजला कळवा तुमचें पडेल तें काम करण्यास व तुमच्याबरोबर वाटेल तेथें येण्यास मी तयार आहे, मात्र माझा सर्व खर्च तुम्ही सोसला पाहिजे; माझी खर्च करण्याची शक्ति नाहीं असें सांगितलें व तें त्यांनीं मान्य केलें व त्याप्रमाणें १९३० च्या मे व जूनमध्यें मी त्यांच्याबरोबर **बदरीकेदार व सिमला, मसुरी, नैनीताल** वगैरे बऱ्याच ठिकाणीं प्रवास केला व नाताळच्या रजेंत म्हैसूरच्या प्रवासाचा योग त्यांच्यामुळें आला व १९३१ च्या उन्हाळ्याच्या सुट्टींत **गंगोत्री जम्नोत्रीचा** प्रवासही त्यांच्यामुळें घडला.

शक्य तों पायीं प्रवास करावा असा माझा नियम आहे परंतु पायीं प्रवासास वेळ फार लागतो. इतका वेळ सर्व उद्योग संभाळून वाट्यास येत नाहीं म्हणून हा श्रीमंती प्रवास ( सर्व प्रवास गाडी, मोटार, टांगा ह्यांच्याच साहाय्यानें झाला ) करण्याची आलेली संधी दवडली नाहीं. त्यामुळें संकटें अशीं प्रवासांत आलींच नाहींत व अर्थात् त्यांतून निभावण्याच्या मार्गांचा शोधही करावा लागला नाहीं.

श्रीमंताच्या मुलांस द्रव्यसाहाय्यामुळें कठीण परिस्थितीशीं झगडावें लागत नाहीं म्हणून तीं जशीं गरिबांच्या मुलांपेक्षा मूर्ख निपजतात तशीच कांहीं अंशीं स्थिति ह्या प्रवासाची झाली आहे. इतर श्रीमंतांच्या प्रवास वर्णनाप्रमाणेंच हें प्रवासवर्णन तयार झालें आहे. परंतु असलेली माहिती मराठी वाचकांपुढें मांडण्याचा मोह न आवरल्यामुळें तें लिहून प्रसिद्ध करण्याच्या

मानगेडींत पडलों आहे. ह्या प्रवासांत मनुष्य स्वभावाची फारशी ओळख करून घेतां आली नाहीं कारण ज्या गरिबांची ओळख करून घ्यावयाची ते रस्त्यानें पायीं चालत होते व त्यांची पर्वा न करणाऱ्या मोटारींतून आम्ही मोठ्या वेगानें पुढें चाललों होतों. पुण्यास श्रीमंतांच्या मोटारींचा सुळसुळाट झाल्यापासून पादचारी गरिबांच्या वाट्यास चिखलानें भरलेलीं गटारें आलीं आहेत. रस्त्याच्या मधून चालण्याची सोय नाहींशी झाली आहे. कोणत्या वेळीं मागून मोटार येऊन धक्का देऊन जाईल त्याचा नियम नाहीं अशी परिस्थिति उत्पन्न झाली आहे. तरी ही हिंदुस्थानांत भांडवलवाल्यांचें राज्य असल्यांमुळें श्रीमंतांचीं दुष्कृत्यें सहजगत्या नजरेस पडलीं; ( कारण सदाचरणानें श्रीमंत होणें हल्लींच्या काळांत तरी फारसें शक्य नाहीं ) तीं मराठी वाचकांपुढें मांडण्याचा व गरिबांच्या परिस्थितीची शक्य ती माहिती वाचकांस देण्याचा यथामति प्रयत्न केला आहे.

माझ्या काश्मिरच्या प्रवासास मराठी वाचकांनीं माझ्या कल्पनेच्या बाहेर उदार आश्रय दिला आहे व आमच्या शाळेचे चालक **मे. प्रो. दत्तो वामन पोतदार,** B.A. व **मे. प्रो. महादेव रामचंद्र परांजपे,**M.A.Bsc. ह्यांनीं पुस्तक शाळेंतील विद्यार्थ्यांस सुटींतील वाचनाकरितां नेमून आपली सक्रिय सहानुभूति व्यक्त केली आहे ह्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तसेंच साहाय्य ह्याही पुस्तकांस मिळेल अशी मी आशा करितों.

ह्या प्रवासवर्णन प्रसिद्धीस बऱ्याच सद्‌गृहस्थांचें साहाय्य झालें आहे. माझे मित्र श्री. **गोपाळ श्रीनिवास निंबवीकर** ह्यांनीं अत्यंत मेहनतीनें पुस्तकांत घालण्याकरितां सुंदर नकाशा काढून दिला त्याचप्रमाणें मजकुरांतही अनेक दुरुस्त्या सुचविल्या त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

माझे स्नेही **श्री. रघुनाथराव खरे.** ( **एडिसनच्या** मराठी **चरित्राचे** कर्ते ) ह्यांनींही मजकूर तपासणें प्रुफें तपासणें वगैरे कामात फार मदत केली आहे. त्याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहे. पुस्तक लिहितांना श्री. **टी. के. सुब्बाराव** यांच्या म्हैसूर गाइडचा फार उपयोग झाला आहे त्यांतील चित्रेंही पुस्तकांत घातलीं आहेत. तसेंच **प्रो. पोफळे** ह्यांनीं स्वतः घेतलेलींही कांहीं चित्रें पुस्तकांत घालण्याकरितां दिलीं ह्याबद्दल त्या उभयतांचें आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत.

दे. भ. **त्र्यंबकराव देवगिरीकर**, B. A. संपादक चित्रमयजगत् ह्यांची मजवर पूर्ण कृपादृष्टि आहे तेव्हां त्यांना मी प्रस्तावना लिहिण्याची विनंति केली व ती त्यांनीं आनंदानें मान्य करून मोठी मार्मिक प्रस्तावना लिहून दिली ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत.

दे. भ. **वासूकाका जोशी** मालक चित्रशाळा व **श्री. शंकरराव जोशी** मॅनेजर चित्रशाळा ह्यांच्या कृपेशिवाय माझीं पुस्तकें बाहेर पडणें शक्यच नव्हतें. तेव्हां त्यांचे उतराई होणें नुसत्या शब्दांनीं शक्यच नाहीं. तेव्हां त्यांनीं अशीच कृपादृष्टी पुढें ठेवावी एवढीच त्यांना विनंति आहे.

माझी इतर स्नेही मंडळी ज्योतिषि **निळकंठराव लवाटे श्री. यशवंतराव रानडे,** सुप्रसिद्ध चित्रकार **श्री. नाडगौडा** ह्यांनींही आपुलकीच्या भावनेनें मजला शक्य तीं मदत केली ह्याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहे.

शेवटीं ज्या परमेश्वराच्या कृपेनें हा प्रवास सिद्धीस गेला त्या परमेश्वराचे आभार मानून व " **माझ्या हिमालयांतील यात्रा** " ह्या नवीन तयार होणाऱ्या तिसऱ्या पुस्तकासही उदार आश्रय देण्याबद्दल जनताजनार्दनास विनंति करून मी आपली प्रस्तावना पुरी करतों.

सर्वांचा नम्र,

नूतन मराठी विद्यालय
हायस्कूल, पुणें शहर.
ता. १ सप्टेंबर १९३१

**मोरेश्वर गोपाळ काळे.**



ती० रा. रा. नीलकंठ गोपाळ काळे.


डिस्ट्रिक्ट कोर्ट–ठाणें.

# अर्पण-पत्रिका.

केला ग्रंथ यथामती जरि मला चातुर्य नाहीं खरें ।।
बंधो जोडुनि हात तो तव पदीं मी अर्पितों आदरें ।।
प्रेमाचें मम चिन्ह हें समजुनी घे नीलकंठा करीं ।।
आशिर्वाद तुझा मिळेल हृदयीं उत्साह वाढे तरी ।। १ ।।

तुझा नम्र बंधु,

विनायक ऊर्फ मोरेश्वर.




कावेरीचें देऊळ, कृष्णराज सागर तलाव.



टिपूचा दर्यादौलत महाल, श्रीरंगपट्टण.

फोटोग्राफर—प्रो. पोफळे परशुरामभाऊ कॉलेज, पुणें.




लालबाग, बंगलोर.



बंगलोर बाजार.



कृष्णराज सागर बंधाऱ्यावरून दिसणारा देखावा.



कृष्णराज सागर बाग.



कावेरीचें देऊळ.
कृष्णराज सागर तलाव.

फोटोग्राफर—प्रो. पोफळे परशुरामभाऊ कॉलेज, पुणें.

सं. ५ आत - ११४
८५ ७०
स.ग्र.भ. - ११

# आमची म्हैसूरची सफर.

( लेखक—मोरेश्वर गोपाळ काळे, पुणें. )

पुष्कळ दिवसांपासूनची इच्छा होती, कीं एकवार **म्हैसूर** संस्थान पाहून यावें. कारण सध्यां असलेल्या संस्थानांत तें एक सुधारलेलें संस्थान आहे. ती इच्छा पूर्ण होण्याचा योग गेल्या नाताळच्या सुट्टींत **भिवंडी** येथील सुप्रसिद्ध वकील श्री. **नारायण सदाशिव** ऊर्फ **नानासाहेब जोग** त्यांच्या कृपेनें आला. कारण त्यांनीं माझा सर्व खर्च सोसण्याचें कबूल करून मजला बरोबर घेतलें. साधारणतः **म्हैसूर** संस्थान व आसपासचीं ठिकाणें पाहाण्यास २०।२५ दिवस तरी पाहिजेत. परंतु रजा फक्त ११ दिवसच होती. तेव्हां शाळाधिकाऱ्यांना जादा रजेबद्दल विचारिलें व सुट्टीस जोडून ४ दिवस रजा त्यांनीं मोठ्या मेहेरबानीनें दिली. त्यामुळें बराच भाग पाहाण्यास सांपडला. प्रो. **भाटे** यांचा **म्हैसूरचा** प्रवास हें पुस्तक आणविलें. श्री. **एन्. टी. ठाकूर** यांचा Echo from Mysore हा लेख फ. कॉ. बुलेटिनमधून वाचला. बऱ्याच मंडळींची गांठ घेऊन ठेवली. माझे स्नेही श्री. **य. न. गोडबोले** ह्यांचे चुलते **बंगलोर** येथें असतात. त्यांची चिठ्ठी घेऊन ठेवली व ता. २४-१२-३० रोजीं दुपारीं ४॥ च्या गाडीनें मी व श्री. **नानासाहेब जोग** अशा दोघांनीं **पुणें** स्टेशन सोडलें. निरोप देण्याकरितां माझे स्नेही श्री. **गोपाळराव निंबर्गीकर** हे स्टेशनवर आले होते. त्यामुळें त्यांची बरीच मदत झाली. गाडींत जागाही चांगली मिळाली. **पुण्याहून** एकदम **बंगलोरला** उतरून पुढें क्रमाक्रमानें **म्हैसूर** पाहण्याचा कार्यक्रम होता. **पुण्याहून बंगलोरला** जाण्यास २ रस्ते आहेत; एक M. S. M. रेलवेच्या गाडीनें थेट **बंगलोरला** वाटेंत न उतरतांच जातां येतें. परंतु पॅसेंजरनें गेल्यास २ दिवस लागतात. मेलनें

गेल्यास १॥ दिवस लागून गर्दीचा त्रास होतो व २॥ रु. पॅसेंजरपेक्षां जास्त पडतात म्हणून आम्ही मद्रास फास्ट पॅसेंजरनें निघालों, ते दुसऱ्या दिवशीं (२५।१२।३०) रोजीं सकाळीं ६॥ वाजतां **गुंटकल** नांवाच्या स्टेशनवर पोहोंचलों. येथून **बंगलोरकडे** जाण्याकरितां दुसऱ्या गाडींत बसावें लागतें. दुसरी गाडी ८–५० ला सुटावयाची होती, म्हणून जमल्यास गांव पाहून यावें व फराळ करूनही यावें, असा विचार होता. परंतु गांव स्टेशनपासून बरेच दूर असावें असें दिसून आलें, म्हणून स्टेशनवरीलच दुकानांत काफी, इडली, तोशा ऊर्फ सांजा, वगैरे फराळ केला. येथेंच आमच्या परशुरामभाऊ कालेजमधील प्रो. **पोफळे** व त्यांचे स्नेही वगैरे मंडळी भेटली. नंतर गाडींत येऊन बसलों व गाडी ८–५० ला सुटली.

**म्हैसूरच्या** सुंदर प्रदेशांतून प्रवासास सुरवात झाली. जिकडेतिकडे तांबडे गुळगुळीत दगड पसरले होते. मधुनमधून हिरवींगार शेतें,त्यांत काम करणारे शेतकरी, जवळच बागडणारीं त्यांचीं मुलें व आपल्या नवऱ्यास मदत करण्यास तयार असलेल्या शेतकऱ्यांच्या बायका नजरेस पडत होत्या. तो देखावा पाहाण्यांत ३ तास केव्हांच निघून गेले व आमची गाडी **धर्मपुरम्** नांवाच्या स्टेशनांत सुमारें १२। ला येऊन धडकली. येथें गाडी सुमारें -॥- तास थांबणार होती येथें स्टेशनमध्येंच ब्राह्मणाची खाणावळ आहे. तींत माणशीं ६ आणे प्रमाणें जेवण मिळतें. जेवण गाडींत नेणें असल्यास १।२ आणे जास्त पडतात; परंतु सामान्य आहार असणाऱ्या २ माणसांस पुरेल इतकें जेवण आठ आण्यांत वाढून देतात. मी तेथेंच जेवणें पत्करलें व श्री. **नानासाहेबांस** गाडींत जेवण नेऊन दिलें. इकडल्या प्रांतांत रोटीभाकरी वगैरे खाण्याची पद्धत नाहीं. प्रथम वरणभात, मग सारभात व शेवटीं ताकभात असा तीनही वेळां भातच खाण्याचा प्रघात आहे. सुमारें १२ वाजतां गाडीनें **धर्मपुरम्** सोडलें. गांवाजवळच एक मोठा तलाव नजरेस पडला. ह्या तलावाच्या पाण्याचा गांवास व शेतास उपयोग होतो.

**म्हैसूर** संस्थानांत प्रवाशास आश्चर्यकारक वाटणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जिकडेतिकडे सारखे लागणारे तलाव. पाण्याची सोय तलाव बांधून केली नाहीं, असें एकही गांव माझ्या पाहाण्यांत आलें नाहीं. प्रत्येक गांवाची पाहाणी करून कोठें कोठें बांध घातले असतां गांवांतील लोकांस पिण्यास व शेतास पाणी मिळूं शकेल ह्याचा विचार करून सारखे ठिकठिकाणीं तलाव तयार केले आहेत. हे तलाव सुमारें ३९००० आहेत. **म्हैसूर** संस्थानांत पाऊस सरासरी ३० इंच पडतो. परंतु पावसानें आणलेलें पाणी

नद्यांच्या द्वारें वाहून जाऊं द्यावयाचें नाहीं, तर तें आडवून ठेऊन त्याचा सदुपयोग करण्याचा पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटचा प्रयत्न चालला आहे. ज्या गांवाजवळ तलाव बांधणें शक्यच झालें नाहीं, त्या गांवास कोठें तरी लांब तलाव बांधून त्याचें पाणी पुरविण्याचा उपक्रम केला आहे. कांहीं तलावांचें क्षेत्रफळ ४० चौरस मैलांपर्यंत वाढलें आहे. बहुतेक नद्या, नाले, ओढे ह्यांस ठिकठिकाणीं बंधारे घालून पाणी आडवून ठेवलें आहे, व ह्या आडविलेल्या पाण्याचे सारखे पाट काढून पाणी चौफेर खेळाविलें आहे. **म्हैसूर** संस्थानचें क्षेत्रफळ जवळजवळ ३०००० चौरस मैल आहे. म्हणजे ३ चौरस मैलास ४ तलाव हें प्रमाग पडतें. हें प्रमाण आश्चर्यकारक नाहीं, असें कोण म्हणेल ? आमच्या कोंकण प्रांतांत पावसाचें मान सरासरी ८० ते १०० इंच असूनही उन्हाळ्यांत कित्येक खेडेगांवांस पिण्यासही पाणी मिळण्याची मारामार पडते. पाण्याकरितां प्राण कंठीं येतात. अशी स्थिति रायगडच्या पायीं प्रवासाच्या वेळीं माझ्या नजरेस आली. हीच परिस्थिति इतर देशी संस्थानांतही आहे.

कोठें गाईवर कर बसव, कोठें म्हशीवर कर बसव, असे कर बसवून उत्पन्न वाढवावयाचें. शेतसाऱ्याची वाढ करण्याकरितां अधिकारी नेमावयाचे ( शेतकऱ्यांच्या दुःस्थितीची चौकशी करण्याकरितां नव्हे हो ) व त्यांनीं २५ टक्के वाढ सुचवली पण आम्ही कृपाळूपणें १०॥ टक्केच केली, म्हणून वडाई मिरवावयाची व आपल्याविरुद्ध विद्वानांनीं (!) तोंडें उघडूं नयेत म्हणून त्यांच्या तोंडांस कुलूप पडेल, अशीं बक्षिसें, छापण्यास मदत वगैरे खर्च गरीब रयतेच्या तोंडाचा घास काढून करावयाचें, नको त्या विषयावर निबंध मागवून १००० रु. बक्षीस लावावयाचें, नाहींतर गरीब कारकुनास महिना तब्बल १५ रु. पगार देऊन शेजारच्या गांवांत स्काउट मंदीर बांधण्याकरितां मोठी मदत करावयाची, असले चाळे करणाऱ्या संस्थानिकांनीं **यूरोप** अगर **ऑस्ट्रेलिया** या देशाच्या सफरी मारण्यापेक्षां एकवार म्हैसूरची सफर मारावी व गरीब प्रजेकरितां कमींत कमी काय करितां येईल, ह्याचा विचार करावा. इंग्रजींत "Charity begins at home" ही म्हण प्रचलित आहे. तिचा अर्थ तरी निदान इंग्रजांपासून शिकून यावा. नुसताच बादशहाशीं संबंध जोडूं नये. **म्हैसूरमध्यें** नोकरांच्या पगाराचें मानही बरें आहे. इतकेंच नव्हे तर इतर ठिकाणच्या मानानें थोडें जास्तही आहे. कारण नुकत्याच म्हैसूरमध्यें झालेल्या एका सभेंत संस्थानांतील नोकरांचे पगार कमी करावे असे ठराव झाल्याचें ऐकिलें. नोकरास १५रु. महिना पगार दिला कीं तो

प्रपंच भागविण्याकरितां प्रजेस छळून पैसे काढणारच. कोणता संस्थानिक १५ रु. त प्रपंच भागतो असें दाखवून देऊं शकेल? परंतु प्रजेस बेजबाबदार संस्थानिक ह्याची पर्वा करितात कशास! पाण्यामुळें उत्पन्नाची वाढ झाली आहे व शेतकरीवर्ग सामान्यतः सुखी आहे. अशा उत्तम सोईचें कारण राज्यास लाभलेले चांगले दिवाण व निपुत्रिक राजे असावे असें वाटतें.

**म्हैसूरच्या** गादीवर बसलेल्या कोणत्याहि राजास औरस संतति नाहीं, म्हणूनच ते प्रजेवर मुलाप्रमाणें प्रेम करीत असावे आणि ह्याकरितांच मला वाटतें, नुकताच एका संस्थानिकाचा मुलगा आपल्याकडे नेऊन देवानें त्यास प्रजेकडे लक्ष देण्यास भाग पाडण्याचा विचार केला असावा. दिवाण पूर्णय्या, शेषाद्रि अय्यर, सर विश्वेश्वरय्या, इत्यादि दिवाणांनीं राज्याच्या भरभराटीकरितां अतिशय प्रयत्न केले. असो. आमची गाडी रात्रीं ८। वाजतां **बंगलोरच्या** स्टेशनवर येऊन सुखरूप पोहोंचली. स्टेशनला लागूनंच 'Thotappah Chetty's choultry—थोटाप्पा चेट्टी यांची धर्मशाळा आहे. तींत वस्ती करण्याचें ठरविलें. धर्मशाळेचें नांव Traveller's Companion नांवाच्या पुस्तकावरून समजलें होतें. धर्मशाळा बांधणाऱ्या लोकांपैकीं बऱ्याच लोकांचा हेतु आपलें नांव सर्वत्र पसरावें असा दिसतो. आणि तेंही बरोबरच आहे. कारण मोठमोठ्या धर्मशाळा बांधण्यास पैसा लागतो व तो पैसा मिळवितांना बहुधा अन्याय, जुलूम वगैरे करूनच मिळवावा लागतो. अशा लोकांची दानत कशी असणार हें उघडच आहे. शेंकडा नव्वद धर्मशाळांचे कारकून अगर वहिवाटदार प्रवाशांशीं बेमुर्वतखोरपणानें वागणारे असतात, असें माझ्या नजरेस आलें आहे. अर्थात् जसा मालक तसाच त्याचा नोकर. धर्मशाळेच्या व्यवस्थापकानें जागा नाहीं, चालते व्हा म्हणून स्पष्टच सांगितलें. परंतु दंडेली केल्याखेरीज जागा मिळत नाहीं असा आमचा पूर्ण अनुभव असल्यामुळें तसेंच राहिलों व एक गृहस्थ खोली सोडून गेल्यानंतर तींत घुसलों. ज्या खोल्यांस कुलपें होतीं त्या उघडून देण्याचें कारकुनाच्या हातांत होतें. परंतु रिकाम्या खोलींत घुसूं नका, हें त्यास सांगतां येईना. कारण आम्ही जादा बाचाबाच केल्यास सर्व अब्रू चव्हाट्यावर यावयाची, ही एक भीति कारकुनास असतेच. ह्या धर्मशाळांचा अगदीं गरिबांस फार थोडा उपयोग होतो. मात्र श्रीमंतास चांगला उपयोग होतो. कारण त्यांच्याकडून धर्मशाळेच्या कारकुनास कांहीं चिरिमिरी मिळण्याचा संभव असतो; आम्ही डोक्यावर बोजा घेऊन तेथें हजर झालों. अर्थात् चिरिमिरी मिळणें त्यास कठीण वाटलें, म्हणून त्यानें जागा नाकारली

असल्या धर्मशाळा निवळ धार्मिक ढोंगाकरितां बांधणाऱ्या लोकांची अब्रू चवाठ्यावर मांडण्याच्या उद्योगास आतां लागलें पाहिजे. " मला काय त्याचें " असें म्हणून स्वस्थ बसून भागणार नाहीं. कित्येक धर्मशाळा बांधणारे लोक वारंवार सारवणें, जमीन करणें वगैरे त्रास नको म्हणून धर्मशाळेस फरशी करून टाकितात. परंतु फरशीवर पसरण्याइतके गरम कपडे गरिबांजवळ नसल्यामुळें त्यांचे झोपण्याचे फार हाल होतात. जमीन नुसती असल्यास तीवर एक धोतर पसरल्यासही ऊब येते. तशी ऊब फरशीवर येत नाहीं. आम्ही गेलों तों बरेचसे गरीब लोक बाहेर थंडींत, पावसांत कुडकुडत बसले होते व धर्मशाळेचा कारकून बऱ्याच खोल्यांना नुसतीं कुलपें ठोकून चैनींत गप्पा मारीत ऑफिसांत बसून त्या गरीब लोकांस येथें बसूं नका, तेथें बसूं नका, चालते व्हा, असे हुकूम नोकरांकडून फर्मावीत होता. धर्मशाळा नांवाच्या कांहीं इमारती **लोणावळें** येथें आहेत. परंतु त्यांत राहाण्याकरितां जागा देण्याचा हक्क मालकांनीं राखून ठेवला आहे. त्याचा परिणाम उन्हाळ्यांत एकाद्या गरिबास त्या धर्मशाळांचा उपयोग ( ज्यास **लोणावळयाचें** ७५-८० रु. भाडें भरणें शक्य नाहीं ) न होतां मालकाचें २००-३०० रु. पगार मिळविणारे स्नेहीसोबती यांसच बहुधा होतो. नांव मात्र बदलण्यास मालक तयार नाहींत. नांव धर्मशाळाच पाहिजे ! असो.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रातर्विधी उरकून जवळच्या दुकानांत कॉफी व उपमा ऊर्फ घावन वगैरेचा फराळ करून भिवंडी येथील सुप्रसिद्ध यंत्रांचे कारखानदार श्री. **गोपाळराव दांडेकर** ह्यांनीं **चामराज** पेठमध्यें उघडलेल्या ऑफिसची चवकशी करीत चालण्यास सुरवात केली कारण त्या कंपनीचे मॅनेजर श्री. **बापुराव गोडबोले** यांस मीं पत्र आणिलें होतें व श्री. **नानासाहेब जोगांची** व त्यांची जुनी ओळख होती. **पुण्याच्या** मानानें **बंगलोर** शहर फारच स्वच्छ दिसलें. सकाळींच सर्व घरांपुढची जागा पाण्यानें साफ करून त्यावर ठिकठिकाणीं सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या, तर कांहीं ठिकाणीं नगरवासिनी स्त्रिया तें काम मनापासून करण्यांत गढून गेलेल्या दिसत होत्या. थंड वेळ, स्वच्छ हवा, सुंदर रस्ते व त्यांवर रांगोळ्यांचें काम करणाऱ्या सुंदर स्त्रिया असा देखावा असल्यानंतर कोणता आळशी मनुष्य आपल्या बिछान्याचा त्याग करून त्या रस्त्यावरून एकादा फेरफटका मारून येण्याची इच्छा करणार नाहीं ?

सुमारें अर्धा मैल विचारीत विचारीत चालून गेल्यानंतर एक चर्च लागलें.

चर्चच्या बाहेरच कुमारी **मेरीचा** पुतळा माणसाच्या एवढा बसविला असून त्यापुढें कांहीं मेणबत्त्या जळत होत्या व समोरच अंधश्रद्धाळु लोक उभे राहून प्रार्थना करीत होते. एक ख्रिस्ती भटजी त्यांस मदत ( प्रार्थनेच्या कामांत ) करीत होता. प्रार्थना आटपेपर्यंत तेथेंच उभा राहिलों. देवळाच्या बाहेर पडतों तोंच पावसास सुरवात झाली. ह्या दिवसांत पाऊस पडेल अशी कल्पना नव्हती, म्हणून छत्र्या वगैरे कांहीं आणल्या नव्हत्या; त्यामुळें तसेंच एका कॉफी क्लबांत शिरलों; कॉफीस उदार आश्रय दिल्यामुळें पाऊस थांबेपर्यंत तेथें बसण्याचा आम्हांस हक्क प्राप्त झाला. इकडे चहाचीं दुकानें जवळजवळ नाहींत. सर्वत्र Brahmin's Coffee club अशा पाट्या इंग्रजींत व कानडींत आढळतात. ह्या ठिकाणीं मधूनमधून चहा मिळतो. परंतु लोक फारकरून कॉफीच पितात. कारण तीहि चहाइतकीच स्वस्त म्हणजे ४।५ पैसे कप भावानें मिळते. मात्र ह्या दुकानांत कॉफी वगैरे पिण्याकरितां चिनीमातीच्या कपबशांचा उपयोग करीत नाहींत. पितळी भांडींच उपयोगांत आणतात.

कॉफीगृहाजवळच चामराज पोष्ट ऑफीस होतें व त्याच्या समोरच G. G. Dandekar & Co. अशी पाटी आढळली. लगेच आंत शिरलों. श्री. गोडबोले भेटले. ते आम्ही येणार म्हणून वाटच पहात होते. त्यांनीं चहाकॉफी बद्दल विचारलें, परंतु नैमित्तिक व प्रासंगिक कॉफीपान झालें असल्यामुळें आम्ही कांहींच नको म्हटलें. ते म्हणाले भोजनास या. परंतु प्रवासांत दुसऱ्याकडे भोजनास ठरल्या वेळीं जाणें महाग पडतें. एकाद्या लांबच्या ठिकाणीं गेलों, जवळ दुसरें ठिकाण पहाण्यासारखें असलें, तर तें सोडून परत फिरावें लागतें व दुप्पटचौपट खर्च होतो त्यापेक्षां तेथेंच कोठें खाणावळींत जेवणें परवडतें. म्हणून केव्हांतरी फराळ करण्यास येण्याचें अभिवचन त्यांस देऊन पुढील चवकशीस लागलों. त्यांस बरोबर घेऊन प्रथम **बंगलोरच्या** मार्केटमध्यें गेलों. मार्केट चांगलें मोठें बांधलें असून त्यांत सर्व प्रकारच्या भाज्या, फळफळावळ वगैरे जिनसांचीं दुकानें आहेत. मार्केटच्या सभोंवतीं मोठा प्रशस्त रस्ता आहे. त्यावर माणसांची बरीच गर्दी होती. त्या रस्त्यावर टांगामोटार वगैरे वहानांना फिरण्याची सक्त मनाई असल्यामुळें पादचारी गरीब लोकांस निर्धोकपणें बाजार करितां येतो. ही गोष्ट इतर शहरांतील म्युनिसिपालिट्यांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मार्केट ज्या भागांत आहे, तेथील इतरहि इमारती मोठ्या भव्य व प्रेक्षणीय आहेत. रस्ते चांगले रुंद असून त्यांस फुटपाथहि मोठमोठे आहेत. मोटारी, झटके

( एक घोड्याची गाडी ), मोटार–बस वगैरे वहानें पाहिजेत तितकीं व स्वस्तहि मिळूं शकतात. मार्केट पाहून श्री. **गोडबोले** यांस निरोप दिला व मोटारबस-मध्यें माणशीं २ आणे भाडें देऊन कॅन्टोन्मेंटचें तिकीट काढून बसलों. जातांना सारख्या मोठमोठ्या सुंदर इमारती लागत होत्या. रस्तेहि चांगले असून मधूनमधून बागाहि दृष्टीस पडत होत्या. त्या पहातां पहातांच आमची मोटार लष्करमधील स्टॅन्डवर येऊन दाखल झाली.

लष्कर हें शहारापासून सुमारें १॥ मैल लांब आहे. परंतु लष्कर व शहर ह्यांच्यामध्यें मोकळी जागा अशी नाहीं. सर्वत्र सारख्या इमारती लागल्या आहेत. तेथून पुन्हां मोटारबसमध्यें बसून माणशीं १ आणा भाडें देऊन **अलसूर** नांवाच्या भागांत पोहोंचलों. येथें एक सुंदर तलाव व **सोमेश्वर** नांवाचें शंकराचें देऊळ पहाण्यासारखें आहे. **सोमेश्वराचे** देवळासमोरच एक सहा मजली मोठें सुंदर काम केलेलें गोपूर ( दर्शनी दरवाजा ) आहे. बराच वेळ गोपुराचें निरीक्षण केल्यानंतर देवालयांत प्रवेश केला. देऊळ सर्व दगडी असून जुन्या पद्धतीचें बांधलेलें आहे. देवळावरील नक्षीकाम पहाण्यासारखें आहे. सभामंडप ओलांडून पलीकडे गेलों, तों जिकडेतिकडे अंधारच अंधार दिसला. कांहीं वेळ उभें राहिल्यानंतर रस्ता साधारणतः दिसतो. **म्हैसूर, बंगलोर** वगैरे ठिकाणीं विजेचा सांठा मुबलक असतां ह्या देवळांस विजेचें दुर्भिक्ष कां? कारण इतकेंच कीं, धानिक लोकांचें लक्ष जुन्या देवळांची दुरुस्ती करण्यापेक्षां नवीन देवळें बांधण्याकडेच जास्त असतें. कारण जुन्याची दुरुस्ती करून होणाऱ्या कीर्तीपेक्षां नवीन देऊळ बांधून मिळणारी कीर्ति जास्त असते. ह्याचा उघड अर्थ असा होतो कीं, त्यांचें लक्ष धर्मा-कडे नसून नांवाकडे आहे. अशा लोकांस परमेश्वर स्वर्गांत जागा देण्याइतका मूर्ख आहे, अशी कां ह्या लोकांची कल्पना झाली आहे? सर्व लोकांच्या बरोबर आम्हीहि ठेंचा खातखात देवळांस प्रदक्षणा घातली. प्रदक्षणेच्या वाटेवर बऱ्याच देवादिकांच्या मूर्ति होत्या. त्या साधारणपणें नजरेस पडल्या. पाकोळ्यांनीं स्वतःच्या वास्तव्याकारितां हें स्थान पसंत केलें असल्यामुळें, सर्व वाटभर घाण मात्र येत होती. देवळांत एक लहानसा विजेचा दिवा होता; परंतु लाग-लेला नव्हता. देऊळ पाहून बाहेर पडलों, तों **बंगलोर** शहरांतील मोठ्या **अल-सूर** नांवाच्या तलावाचा शोध करीत चाललों. वाटेनें सारखीं एकमजली स्वच्छ घरें लागत होतीं. रस्तेहि स्वच्छ होते. देवळापासून सुमारें २।३ फर्लांगांवरच **अलसूर** तलाव आहे. हा तलावहि पाणी आडवून तयार केला आहे. हा तलाव

जमिनीच्या पातळीपेक्षां उंचावर असल्यामुळें ह्याच्या पाण्याचा उपयोग बागाईत शेतीकडे चांगला होतो. ह्या तलावानें सुमारें १२५ एकर जागा आडविली आहे. तलाच्या कांठावर एक सुंदर बागहि तयार केली आहे. परंतु आम्ही गेलों त्या दिवशीं पाऊस फार पडत असल्यामुळें त्या बागेंत बांकावर बसण्याची सोय नव्हती. तलावाच्या कांठावर एक लहानशी टेकडी आहे, तीवरून तलावाचा देखावा फार सुंदर दिसतो म्हणतात; परंतु ती सध्यां लष्करी शिपायांनीं व्यापिली असल्यामुळें तो देखावा आम्हांस पहातां आला नाहीं. तलावाच्या कांठानें मजा पहात पहात चाललों असतां वाटेंत एके ठिकाणीं तलावाच्या कांठाचा कांहीं भाग खचला होता त्याच्या दुरुस्तीचें काम चाललें होतें, त्या ठिकाणीं पोहोंचलों. एक महाराष्ट्रीय गृहस्थ कामावर देखरेख करीत होते. पोशाखावरून त्यांस आम्ही ओळखिलें व आपण इकडे कसे आलां म्हणून प्रश्न केला. त्यांचें नांव रा. **काशीनाथ विनायक जोशी** असून **टाटा कंपनींत** इंजिनियरचें काम करितात. कंपनीनें ह्या कामावर त्यांची नेमणूक केल्यामुळें ते इकडे आल्याचें समजलें. त्यांचें मूळ गांव **रत्नागिरी** जिल्ह्यांत **दापोली**जवळ **जालगांव** हें गांव आहे. त्यांनीं बरीच माहिती दिली व एक दिवस रात्रीं भोजनास या म्हणून आमंत्रण दिलें. परंतु आपल्या कार्यक्रमांत भोजन आड येतां कामा नये, असा आमचा शिरस्ता असल्यामुळें मुद्दाम रात्रीं भोजनास येतां येत नाहीं, असें आम्हीं त्यांस दिलगिरीपूर्वक सांगितलें. त्यांनीं फारच आग्रह करून निदान आतांच जेऊन जा, असें सांगितलें तें मात्र आम्ही नाकारलें नाहीं. चालून थकल्यामुळें भूकहि चांगली लागली होती व त्यांनींहि मोठ्या प्रेमानें सुग्रास भोजनाचा लाभ दिला, त्यामुळें आमचा चांगलाच श्रमपरिहार झाला. त्यांना रहाण्याकरितां दरमहा अवघ्या २० रु. भाड्यांत एका बंगल्याचा संबंध तिसरा मजला मिळाला आहे. इतक्या जागेस **पुण्यास** ६०।७० रु. भाडें पडेल. त्यांच्याकडे भोजन उरकलें. मराठी वर्तमानपत्रेंहि वाचावयास मिळालीं. तीं वाचून दुपारीं सुमारें ३ वाजतां बाहेर पडतांना श्री. **नानासाहेबांनीं** त्यांस **भिवंडीस** व मी **पुण्यास** येण्याबद्दल आमंत्रण दिलें व त्यांनीं केलेल्या उत्तम आदरातिथ्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून त्यांचा निरोप घेतला. व **कबनपार्कच्या** रस्त्यास लागलों.

विचारीत विचारीत **कबनपार्कला** येऊन पोहोंचलों. ह्या पार्कनें सुमारें १०० एकर जागा व्यापिली आहे. आंत अनेक प्रकारचे मोठमोठे वृक्ष असून हिरवीगार पटांगणें, जिकडेतिकडे दिसून येतात. ही सर्व बाग

# आमची म्हैसूरची सफर.

फिरण्यास ४॥ तास लागतील. आम्ही बागेंत प्रथमच दिसणाऱ्या इमारती गांठल्या. चौकशीअंतीं त्यांतील एक इमारत **म्हैसूर** संस्थानच्या सेक्रेटरीएटची असून दुसरी सार्वजनिक लायब्ररीची आहे असें समजलें. आम्ही चालू सालींच **सिमल्याच्या** सेक्रेटरीएटची इमारत पाहिली होती. तेव्हां ही इमारत पहातां आल्यास पहावी, म्हणून आंत शिरलों व शिपायाबरोबर चिठ्ठी पाठवून सेक्रेटरीएटच्या रजिष्ट्रारची भेट घेतली. व त्याजकडून परवानगी मिळविली. त्यानें दिलेल्या शिपायाबरोबर सर्व इमारत पाहिली. इमारत दोन मजलीच आहे; पण बांधकाम फार प्रेक्षणीय आहे. **सिमल्याच्या** सेक्रेटरीएटपेक्षां फक्त १ मजला कमी आहे. ह्यापेक्षां कोणत्याहि बाबतींत आम्हांस ह्या इमारतींत उणेपणा आढळला नाहीं. सर्व काम व्यवस्थितपणें चाललें होतें. इमारत पाहून सार्वजानिक वाचनालयांत प्रवेश केला. वाचनालयहि बरेंच मोठें असून त्यांत वर्तमानपत्रें, मासिकें, ह्यांची गर्दीच उडून गेली होती. पुस्तकें देणेंघेणें वगैरे कामें शिपाई, कारकून वगैरे मंडळी फार दक्षतेनें करीत होती. कांहीं वेळ वाचून बाहेर पडलों, व झटका करून धर्मशाळा गांठली. रात्रीं विश्रांती घेऊन दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुढील प्रवासाचा कार्यक्रम आखण्याकरितां स्टेशनवर गेलों.

**म्हैसूर** प्रांतांत **म्हैसूर** स्टेटची स्वतंत्र रेल्वे आहे. तेव्हां तिचें टाईमटेबल मिळतें कीं काय ह्याची चवकशी केली. स्टेशनमास्तर म्हणाले इंग्रजी टाईम टेबल छापलें नाहीं. कानडी पाहिजे असल्यास देतों. परंतु कानडीचा आम्हास कांहींच उपयोग नव्हता. तेव्हां मी मास्तरांस म्हणालों, निदान स्टेशनवर लावावयाचा इंग्रजी पोस्टर तरी द्या. बरीच वाटाघाट केल्यावर मास्तरांनीं पोस्टर दिला. त्यावरून पुढचा प्रोग्राम ठरवून स्टेशनच्या बाहेर पडलों व "**बसवनगुडी**" नांवाच्या **बंगलोर**जवळच असलेल्या नवीन वसाविलेल्या भागांत गेलों. ह्या भागांतील बहुतेक घरें एक मजली एकमेकापासून थोड्या थोड्या अंतरावर बांधलीं असून, रस्ते रुंद व दोन्ही बाजूस फूटपाथ बांधलेले आहेत. ह्या भागांची स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे. हवेच्या दृष्टीनें हा भाग फारच उत्तम आहे. ह्याच भागांत **बंगलोरची** सुप्रसिद्ध **लालबाग** नांवाची मोठी बाग आहे. मोटारमधून उतरून सुमारें २ फर्लांग चालल्यानंतर ह्या बागेचें प्रवेशद्वार लागतें. जातांना वाटेंत एक सुंदर पक्की दगडी इमारत बांधण्याचें काम चाललें होतें व तीवर Maharastra Mahila Vidyalaya अशी पाटी होती. तीवरून ह्या भागांत सधन महाराष्ट्रियांची बरीच वस्ती असावी, असा अंदाज बांधिला; परंतु


पडताळा पहाण्यास वेळ नसल्यामुळें तसाच पुढें सटकलों, तों बागेंत येऊन दाखल झालों.

ह्या बागेचें क्षेत्रफळ सरासरी १५० एकर आहे. बागेंतील रस्ते रेखीव असून नाना प्रकारचीं फळझाडें व फुलझाडें ह्या बागेंत लावलीं आहेत. **हिंदुस्थानांत** असलेलीं बहुतेक झाडें येथें पहावयास सांपडतात. बागेजवळच एक मोठा तलाव तयार केला आहे. त्याच्या पाण्याचा बागेस उपयोग होतो. ह्या बागेंत झाडें वगैरे जरी **काश्मीर**च्या बागांसारखीं लाविलीं असलीं, तरी **काश्मीर**च्या बागांत जसें चहूंकडे पाणी खेळविलें आहे, तसें ह्या बागेंत दिसत नाहीं. मधून मधून कांहीं हौद आहेत. त्यांत रंगी बेरंगी बऱ्याच वनस्पती आहेत; परंतु त्या हौदांचेंही पाणी असावें तितकें स्वच्छ नाहीं. मात्र **काश्मीर**च्या बागांपेक्षां हिचें क्षेत्र मोठ आहे. बसण्यास ठिकठिकाणीं बाकें ठेविलीं आहेत. बागेच्या मधोमध एक कांचेच्या तावदानांचा मांडव लागतो, त्यांतही झाडें वगैरे लावून त्यास शोभा आणिली आहे. ही बाग प्रथम **म्हैसूरचा** राजा **हैदरअली** यानें तयार केली. पुढें **टिपूसुलतान** व त्यानंतर आलेले राजे ह्यांनीं तींत सुधारणा केली. अशी बाग आज १५० वर्षें सुधारत आहे व अजून सुधारण्याचें काम चालूच आहे. अर्थात् ह्या बागेची **हिंदुस्थानांतील** प्रसिद्ध बागांत गणना केली जाते.

बाग पाहून बाहेर पडलों व एक बैलाचा झटका करून, मार्केटपाशीं आलों. भाडें ३ आणे पडलें व तेथून **कबन** पार्कमध्यें असलेलें म्युझियम ( अजबखाना ) पाहाण्यास पुन्हां झटका करून गेलों. मार्केटपासून मोटारीही सुटतात. माणशीं २ आणे भाडें पडतें, पण झटका दोघांस ३ आण्यांतच मिळाला. झटक्यांत ४।५ माणसांस बसतां येतें. अर्थात् जर बऱ्याच मंडळीस एकदम फिरावयाचें असेल, तर मोटारीपेक्षां झटक्यांतून फिरणें स्वस्त पडतें.

**म्युझियमची** इमारत पक्की तांबड्या रंगाची असून दोन मजली आहे. दोन्ही मजल्यावर पाहाण्यासारख्या पुष्कळ वस्तु आहेत. मोठमोठ्या कांचेच्या कपाटांत वाघ, सिंह इत्यादि प्राण्यांचीं शरीरें पेंढा भरून ठेविलीं आहेत. **श्रीरंगपट्टणचा** देखावा एका उठावाच्या नकाशानें तयार करून ठेविला आहे त्यावरून पूर्व काळीं **श्रीरंगपट्टणला** महत्त्व कां होतें, तें कळून येतें. हस्तीदंत, लाकूडकाम वगैरेचे अनेक प्रकारचे नमुने येथें ठेविले आहेत. म्युझियम् साधारण बऱ्यापैकीं आहे.

**म्युझियम** पाहून परत श्री. **गोडबोले** यांच्याकडे जातांना वाटेंत **टिपूसुलतानाचा** वाडा लागला. वाड्याची इमारत चांगली बांधली




बंगलोर येथील सेंट्रल कॉलेज.

असून तींत अनेक चित्रें वगैरे काढलीं आहेत. सध्यां त्या इमारतीचा स्काउट हेडक्वार्टर्स म्हणून उपयोग केला जातो. ज्या ठिकाणीं पूर्वी इंग्रजांस **हिंदुस्थानांतून** घालवून कसें द्यावें, ह्यासंबंधीं टिपूचीं कारस्थानें चालत असत, त्याच ठिकाणीं आतां इंग्रजांबद्दल राजनिष्ठा शिकविण्याचें शिक्षण दिलें जावें ही किती आश्चर्याची गोष्ट आहे. स्काउट चळवळीशीं पूर्वी माझा वराच संबंध आला होता, तेव्हां **म्हैसूर**च्या स्काउटची चळवळ कशी चालली आहे तें तरी एकवार पहावें म्हणून ऑफिसची चवकशी केली. एक मुसलमान गृहस्थ ऑफिसमध्यें बसले होते. त्यांस माहिती विचारिली. १९२८।२९ सालीं एकंदर २०००० रु. खर्ची पडले. पैकीं १०००० रु. मोठमोठ्या अधिकाऱ्यांचे पगाराबावत असून १०००० रु. किरकोळ ग्रॅन्ट्स्, फर्निचर वगैरेकरितां खर्च पडले. पुण्यापासून म्हैसूरपर्यंतची चळवळ एकाच शिस्तींत चालल्याचें पाहून इंग्रजांच्या कर्तबगारीचें कौतुक वाटलें. **पुण्याप्रमाणें** इकडे सुद्धां फक्त मोठमोठ्या वरिष्ठ अंमलदारानांच पगार मिळतो. रिपोर्टांत त्यांच्या नांवाचा गाजावजा; स्काउट मास्तरांची फक्त संख्या लिहिलेली; त्या गृहस्थास पुण्यास सुद्धां स्काउटमास्तर ऑनररी काम करितात व मोठे ऑफिसर पगार खातात हें ऐकून थोडेसें आश्चर्य वाटलें. व असें कां म्हणून त्यांनीं मला विचारिलेंही. मी सांगितलें कीं, मोठमोठ्या ऑफिसरांस घसा कोरडा पडेपर्यंत गरीब स्काउट मास्तरांस सांगावयाचें असतें, कीं, " बाबानो, स्वार्थत्याग करा, स्वार्थत्याग करा; त्याशिवाय देशाचा तरणोपाय नाहीं. " मग त्यांस पगार नकोका ? स्काउट मास्तरांना त्यांच्या हाताखालीं काम करावयाचें असतें. ते उलटून त्यांस कसें विचारणार ? १९२५ सालीं **साताऱ्या**च्या स्काउट मास्टर्स परिषदेंत स्काउट मास्टर्सना पगार द्यावा, असा ठराव आला असतां, त्यास Scouting is rest itself असें म्हणून कित्येक पढतमूर्खांनीं ( पुस्तकी विद्वानांनीं ) विरोध केला. आणि आतां ते स्काउटिंग सोडून स्वस्थ बसले आहेत. ह्या चळवळींत बराच भरणा पुस्तकी विद्वानांचाच झाला आहे. एक गृहस्थ मला म्हणाले, "तुम्ही स्काउट मास्तर आपली स्काउटिंगची चळवळ राजकारणा पासून अलिप्त ठेवतां, तर मग तुम्ही खादी कशी वापरतां ? " मी त्यांस म्हणालों, मी खादी काटकसरीच्या दृष्टीनें वापरतों. पण जर आपली चळवळ राजकारणापासून अलिप्त तर तिच्या मुख्याधिकाराच्या ठिकाणीं गव्हर्नरसारखे मुख्य राजकारणीच पुरुष कां ? त्यांस धांवत्या वाऱ्यांत उघड्यावर स्वयंपाक करून जगण्याची व पायांनीं प्रवास ( माझ्यासारखा ) कर-

ण्याची ताकत आहे काय?" परंतु त्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला नाहीं. **म्हैसूर**लाही चीफ स्काउटची जागा राजामहाराजांनींच आडविली आहे. असो. तेथून निघालों तों श्री. **गोडबोले** ह्यांच्याकडे गेलों व त्यांजबरोबर फराळाच्या दुकानांत जाऊन त्यांच्या पाहुणचाराचा यथास्थित स्वीकार करून व त्यांनीं केलेल्या आदरातिथ्यावद्दल त्यांचे आभार मानून धर्मशाळेचा रस्ता सुधारला. **बंगलोर** येथील हवा आतिशय उत्तम आहे. रस्ते वगैरे स्वच्छ आहेत. राहाणी स्वस्ताईची आहे. वस्ती **बंगलोर** शहर, लष्कर व आसपासचा भाग मिळून सुमारें २॥ लाख आहे. शहराचें क्षेत्रफळ सुमारें २५ चौरस मैल आहे. शहर सपाट नसून कांहीं भाग उंच व कांहीं खोल असें वसलें आहे. कांहीं ठिकाणांची समुद्र-सपाटीपासून उंची २९३५ फूट आहे तर कांहींची ३०६१ फूट आहे. शहरांत रेशीम, लोकर, चंदनी, तेल वगैरेंच्या बऱ्याच गिरण्या आहेत. मोठमोठल्या कॉलेजच्या इमारती, महाराजांचा राजवाडा वगैरे ठिकाणें पहाण्यासारखीं आहेत. सुप्रसिद्ध **इंडियन सायन्स इन्स्टिटयूट** नांवाची संस्था आहे. ह्या संस्थेनें ३७० एकर जागा व्यापिली असून सालीना कित्येक लाख रुपये खर्च केले जात आहेत. ह्या संस्थेस माजी कोट्याधीश मि. **जे. एन्. टाटा** व त्याचे चिरंजीव **सर दोराबजी टाटा व सर रतनटाटा** यांनीं ३० लाख रुपयांची देणगी दिली आहे संस्थेचा उद्देश **हिंदुस्थानांतलि** कलाकौशल्य व उद्योगधंदे ह्यांची वाढ होण्याकरितां उपाय शोधून काढणें हा आहे. **म्हैसूर** सरकारनें ५ लाख रुपये संस्थेस आरंभींच दिले असून वार्षिक खर्चाकरितां संस्थानांतून ५० हजारांची मदत दरसाल मिळत असते. ह्या ठिकाणीं ठिकठिकाणाहून शिकण्याकरितां विद्यार्थी येत असतात. सर्व ठिकाणें पाहाण्याइतका वेळ नसल्यामुळें दुसऱ्या दिवशीं(ता. २८।१२।३०)रोजीं सकाळीं **बंगलोरला** रामराम ठोकून **शिवसमुद्र** धबधब्याची वाट धरली.

**बंगलोरहून शिवसमुद्रास** जाण्याकरितां मोटारी मिळतात; पण त्या मार्केटजवळून सुटत असल्यामुळें आम्ही धर्मशाळेजवळच असणाऱ्या स्टेशनवरून जाण्याचें निश्चित केलें. स्टेशनवर जाऊन प्रथम मद्दूरचीं तिकिटें खरेदी केलीं.

तसेंच एक **म्हैसूरगाइड** नांवाचें १ रु. किमतीचें इंग्रजी पुस्तक खरेदी केलें. त्याचा पुढें फार उपयोग झाला. **बंगलोर** तें **मद्दूर** अंतर ४६ मैल आहे. तिसऱ्या वर्गाचे प्यासेंजरचें भाडें १३ आणे व मेलचें १५ आणे पडतें. परंतु सकाळीं ८ वाजतां सुटणारी गाडी मेलच असल्यामुळें भाडें जादा पडलें. **बंगलोर**



बंगलोर येथील राजवाडा.

सोडल्यानंतर कांहीं वेळ साधारण सपाट प्रदेशांतून प्रवास करावा लागतो. परंतु सुमारें ३५ मैलावरील **चन्नापट्टण** नांवाचें गांव सोडल्यानंतर फारच बहारीचा देखावा दिसूं लागतो. डाव्या उजव्याहातास पिवळ्या जर्द भाताचा समुद्रच पसरल्याचा भास होतो. कांहीं वेळानें सुंदर रेखीव अशा नारळाच्या बागा दृष्टीस पडतात, तर मधूनमधून शेतकरी भात कापण्याच्या कामांत गर्क झालेले आढळून येतात. देखावा पहातां पहातां स्टेशनांत गाडी येऊन थडकली. तों १० चा सुमार होता.ह्या स्टेशनवर खाणावळ आहे. तींत भोजन करून पुढें जाण्याचा विचार होता, म्हणून **बंगलोर**लाही फारसा फराळ केला नव्हता. उतरल्यांबरोबरच पुष्कळ मोटारएजंटांनीं आमच्या मोटारींतून चला म्हणून गर्दी केली व लगेच मोटार सोडतो म्हणूनही सांगितलें. त्यांस उतारूंच्या सुखसोईकडे पाहाण्याचें कारण काय ? त्यांचें भाडें त्यास मिळालें कीं झालें. ह्या त्यांच्या वृत्तीमुळें आमची मात्र उपासमार झाली. मोटार लवकरच सुटणार, तेव्हां **शिवसमुद्रासच** एकाद्या खाणावळींत जाऊन जेवण करूं,असा विचार करून एका मोटारींत वसलों. एजंटानें अगाऊच पैसे घेऊन तो **म्हैसूर**कडून येणाऱ्या गाडीची वाट पहात वसला. सुमारें ११ वाजतां मोटार सुटली.

ह्या ठिकाणीं पुन्हां प्रो. **पोफळे** यांची व आमची भेट झाली. आम्हांस **कोलार**च्या सोन्याच्या खाणी पाहाण्यास वेळ मिळाला नव्हता. परंतु प्रो. **पोफळे** खाणी पाहून आले होते, त्याजकडून कांहीं माहिती मिळविली. अगाऊ परवानगी घेतलेली असल्यास खाणीच्या आंत उतरूं देतात. आयत्या वेळीं परवानगी मागितल्यास माणशीं ३ रु. प्रमाणें पैसे द्यावे लागतात. शिवाय जिवास अपाय झाल्यास आम्ही जबाबदार कंपनी जबाबदार नाहीं, असें अगोदर लिहून द्यावें लागतें, तेव्हांच खाणीच्या आंत जावयास सांपडतें. जमिनीच्या पृष्ठभागापासून आंत सुमारें १ मैल विजेच्या पाळण्यानें गेल्यानंतर खाणी लागतात. कधीं कधीं पाळणा तुटतो, कधीं आंत सुरुंग लावतांना जमीन कोसळून त्या खालीं माणसें सांपडून मरतात.असे अपघात वारंवार होतात. खाणीच्या **मालकांस भरपूर फायदा होतो, परंतु जमिनीच्या पोटांत काम करणाऱ्या मजुरांस मात्र अगदीं थोडी मजुरी मिळते**.तेव्हां भांडवलवाल्यास आत्मा नसतो, ह्या **बोल्शेविकां**च्या तत्त्वाचें प्रत्यंतर येथें चांगलें दिसून येतें. असो.

मोटारभाडें जाऊन येऊन माणशीं ३ रु. पडलें. येथून **शिवसमुद्र** सुमारें ३० मैलांवर आहे. आपल्या इकडच्या सध्यांच्या मानानें मोटारभाडें

जास्तच पडलें; परंतु ह्याचें कारण मोटारवर इकडे कर फार आहे. व तो पैसा सडका दुरुस्तीकडे खर्च केला जातो. पैसा जास्त जातो खरा, पण त्या मानानें उतारूंस सुख पण लागतें. ब्रिटिश हद्दीपेक्षां इकडील सडका अतीशयच चांगल्या आहेत. सडकेवरून जातांना मधूनमधून लहान रस्ते फूटून ज्या वेळीं ते एकाद्या गांवाकडे जातांना आढळत, त्या त्या वेळीं रस्त्यावर एक मोठी दगडी पाटी लावलेली आढळून येई. आणि तिच्यावर त्या गांवाचें नांव इंग्रजींत व कानडींत कोरलेलें असे. अशी व्यवस्था पायीं प्रवास करणाऱ्याच्या फार उपयोगाची असते. वाटेंत लागणाऱ्या प्रत्येक गांवाजवळ गांवाच्या नांवाची पाटी असून सन्माननीयांचा सन्मान करण्याचा प्रसंग आल्यास कमान लवकर उभारतां यावी म्हणून पक्के चुन्यानें बांधलेले दोन स्तंभही उभे केलेले असत. १९१६ सालीं निजामच्या राज्यांतून प्रवास करीत असतांना ह्याच्या अगदीं उलट अनुभव आला. सडका एकदां बांधल्यानंतर त्यांची दुरुस्ती कधीं झाली होती हें त्या परमेश्वरासच माहीत. **गोदावरीच्या** एका तीरावरून दुसऱ्या तीरावर गाड्या नेतांना मंडळींचा प्राण कासावीस झाला. रस्त्यावर मोऱ्या तर अगदींच थोड्या आढळल्या. लहानसा का ओहोळ येईना, गाडी प्रथम उतरावयाची व नंतर चढावयाची. अशाही परिस्थितींत निजामाचे गोडवे गाणारे लोक सांपडतात, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे ! असो. इकडे गांव आपल्याकडच्या गांवांपेक्षां जास्त स्वच्छ दिसतात. साधारणपणें फाटके व अपुरे कपडे घालणारे लोक फार थोडे आढळतात. राहाण्यास बऱ्याच लोकांस पक्की बांधलेलीं घरें मिळूं शकतात. स्टेशनपासून सुमारें १३ मैलांवर **मलवल्ली** नांवाचें तालुक्याचें गांव लागलें. येथें कांहीं वेळ मोटार थांबली.

येथून **निलगिरी** पर्वत दिसूं लागला. मोटार गर्द झाडींतून प्रवास करूं लागली. आणखी सुमारे १५ मैल गेल्यानंतर To Falls अशी पाटी लागली, तिकडे मोटार वळली. धबधब्यापासून दोन मैल अंतरावर विजेचा कारखाना आहे. धबधब्याजवळ गांव नाहीं. मोटार एका डोंगराच्या कड्याजवळ उभी राहिली. नंतर सर्व मंडळी धबधबा पाहाण्यास गेली. सुमारें १।२ फर्लांग उतरल्यानंतर धबधब्याची शोभा चांगली दिसूं लागली. ह्या ठिकाणीं **कावेरी** नदी सुमारें २०० फुटावरून खालीं उडी घेते. एकंदर २।३ निरनिराळ्या प्रवाहांनीं पाणी खालीं पडतें. ज्या ठिकाणीं पाणी पडतें, तेथें एक मोठा खोल डोह तयार झाला आहे; पाण्याचे दगडावर हापटल्यामुळें बनलेले तुषार लांबवर

नं. १७

उडून फारच आनंददायक देखावा दिसतो. तो देखावा पाहातांना तेथून हलूं नये, असें वाटतें. बरोबरच्या कांहीं मंडळींनीं कॅमेरे आणिले होते. त्यांनीं देखाव्यांचे फोटो घेतले. १२ वाजण्याचा सुमार झाला म्हणून फारसें खालीं न जातां परतलों व मोटारनें **शिवसमुद्र** येथील विजेचा कारखाना पाहाण्यास गेलों.

आमच्याच मोटारमधून **मुंबईचे** प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. **ठक्कर** हे प्रवास करीत असल्यामुळें, त्यांना कारखाना दाखविण्याकरितां एक मोठे अधिकारी येऊन दाखल झाले व त्यांच्याबरोबर आमची वर्णी विनतक्रारच लागली. **कावेरी** नदीचा पाट काढून पाणी आणून एका तलावांत सांठविलें आहे व तेथून ते मोठमोठ्या नळांनीं ४०० फूट खोलीवर बांधलेल्या पावर हाऊसमध्यें नेऊन त्याच्या जोरावर वीज उत्पन्न केली आहे. एकंदर मोठमोठ्या १३ नळांनीं पाणी खालीं नेलें आहे. खालीं उतरण्याकरितां पायऱ्यांप्रमाणें ३ वाक असलेल्या लाडिसांची योजना केली आहे. लाडिसें लोखंडी दोरास बांधून ती खालीं सोडलीं जातात. मात्र नेहमीं एक लाडीस वरतीं व एक खालतीं असतें. ज्या वेळीं वरचें खालीं जाऊं लागतें त्याच वेळीं खालचें वर येऊं लागतें. लाडीसांत बसून खालीं जातांना तुटून खालीं एकदम तर घसरणार नाहींना, अशी भीति वाटते. खालीं लाडिस गेल्यानंतर आम्ही कारखान्यांत शिरलों. मोठमोठीं यंत्रें जोरानें फिरत होतीं. बाहेर सपाट्यानें पाणी वहात होतें. जिकडे तिकडे ताराच तारा असून Danger, Danger—( धोका, धोका, ) अशा पाट्या मारल्या होत्या. कांहीं तारांत मनुष्यानें हात लावल्याबरोबर त्याचा प्राण घेण्याइतकी शक्ति होती. अर्थात् आम्हीं अगदीं दुरून फार जपून चाललों होतों. बरोबरच्या मनुष्यानें माहिती घसा कोरडा पडेपर्यंत दिली. ( कारण कारखान्यांत सारखा आवाज चालत असल्यामुळें माहिती ओरडून द्यावी लागते. ) परंतु फारच थोडी माहिती आम्हांस समजली. ह्या कारखान्यांत सुमारें ३४००० अश्वशक्ति इतकी वीज तयार होते. पैकीं

| | |
|---|---|
| **कोलारच्या सोन्याच्या खाणी** | २४००० |
| **बंगलोर** | ६००० |
| **म्हैसूर** | २५०० |
| इतर ठिकाणें | १५०० |

ह्या प्रमाणांत तिची वांटणी होते.

हे आकडे १९२५ सालापर्यंतचे आहेत. ४५००० अश्वशक्तीची वीज तयार

करण्याचा चालकांचा विचार त्यावेळीं होता. आतां बहुतेक काम पुरें होत आलें असावें. ह्या कारखान्याकरितां आतांपर्यंत सुमारें २ कोट रुपये खर्च केले आहेत. सुमारें ३० वर्षांपूर्वी कामास सुरवात झाली. दरसाल थोडीथोडी वाढ चाललीच आहे. कारखान्याच्या आसपास गांव नाहीं. फक्त कारखान्यांतील कामगारांच्या राहाण्याकरितां लहान लहान इमारती बांधल्या आहेत तितकीच वस्ती. त्यामुळें येथें खाणावळ वगैरे सोई नाहींत. एक रहदारी बंगला आहे; परंतु त्याचा उपयोग वड्या लोकांसच होतो. त्यांत दुपटीपासून चौपटीपर्यंत जिनसांची ( फराळाच्या ) किंमत पडते. त्यामुळें ३ वाजेपर्यंत **कावेरीच्या** पाण्यावरच काळ काढला. मात्र सभोंवार डोंगर गर्द झाडींनें भरले आहेत. कालव्याचें पाणी स्वच्छ असून तें मंद वाहात आहे. कांहीं मंडळी त्यांत स्नान करीत आहेत, तर कांहीं त्याच्या कांठावर बसून चकाट्या पिटीत आहेत, हा देखावा पाहून भुकेबद्दल विशेष कांहीं वाटलें नाहीं. मोटार ३॥ ला सुटली व ४॥ च्या सुमारास मद्दूर स्टेशनवर येऊन दाखल झाली.

खाणावळींत चौकशीकरितां खाणावळवाला म्हणाला, जेवणाची वेळ निघून गेली. आतां रात्रीं जेवण. पाहिजे तर उपमा, इडली, कॉफी वगैरे पदार्थ तयार आहेत देतों. तेव्हां त्यांचाच थोडासा आस्वाद घेऊन गाडीची मार्गप्रतीक्षा करीत बसलों. सुमारें ५ वाजतां गाडी आली. येथून एकदम म्हैसूरचेंच तिकीट घेतलें. कारण कदाचित् **श्रीरंगपट्टण** येथें धर्मशाळा नसेल व मग रात्रीं राहाण्यास पंचाईत पडेल, त्यापेक्षां एकदम म्हैसूरला उतरून दुसऱ्या दिवशीं श्रीरंगपट्टणला सामान धर्मशाळेंत ठेवून यावें असा विचार करून गाडींत बसलों. तों ७। वाजतां म्हैसूरला येऊन दाखल झालों.

आमचा बोजे वगैरे घेण्याकरितां कुली करण्याचा परिपाठ नव्हता. परंतु धर्मशाळा विचारीत विचारीत सामान घेऊन जाण्यास त्रास पडतो व सर्वांस धर्मशाळा माहितही नसते म्हणून २ आण्यांस एक कुली केला, स्टेशनपासून सुमारें २॥ फर्लांगावर असलेल्या Nanj Raja Bahadur Chattaram Ellawal Road. **नांजराजा बहादूर छत्रम, एल्लावल** रोड नांवाच्या धर्मशाळेंत त्यानें आम्हांस सोडलें. प्रथम जागा शिल्लक नाहीं, येथें **आयुर्वेदिक कान्फरन्स** आहे, तिच्या प्रतिनिधींनीं बहुतेक जागा अडवली आहे, वगैरे गोष्टी कारकुनानें सांगितल्या. परंतु बरीच वाटाघाट केल्यानंतर त्यानें एक दुसऱ्या मजल्यावरची सुंदर खोली आम्हांस उघडून दिली. खोलींत विजेच्या

दिव्याचीही सोय होती. सामान खोलींत ठेवून खाणावळीच्या शोधास लागलों. सुमारें १ मैल खाणावळीकरितां चालावें लागलें. **अलिगड** येथील एका हिंदुस्तानी मनुष्यानें **आर्यभुवन** नांवाची खाणावळ चालविली आहे. त्यास हिंदी येत असल्यामुळें आमची सोय चांगली झाली. माणशी दरही थोडा म्हणजे एकवेळचा ५ आणेच पडला. येथें राहाण्याची सुद्धां सोय आहे. भोजन करून धर्मशाळेंत येऊन झोंपीं गेलों.

दुसऱ्या दिवशीं (ता. २९।१२।३०) रोजीं सकाळीं उठून **चामुंडी** नांवाच्या टेकडीवर असलेल्या देवीच्या दर्शनाकरितां निघालों; तों प्रथम मार्केटच्या रस्त्यास लागलों तोंच, वाटेंत वैद्यसंमेलनाकरितां आलेली पुण्याची श्री. **पु. ग. नानल,** श्री. **कवडेशास्त्री** वगैरे मंडळी भेटली. औपचारिक कुशल प्रश्न झाले. नंतर पुढें चालूं लागलों, तों एके ठिकाणीं विजेच्या शक्तीवर चाललेला हातमागाचा कारखाना लागला. इकडे वीज स्वस्त असल्यामुळें हातमाग विजेच्या शक्तीवर चालविणें फायदेशीर पडतें, असें चालकांनीं सांगितलें. नंतर **म्हैसूरच्या** टोलेजंग मार्केटमध्यें गेलों. तेथें सर्व प्रकारचीं दुकानें मालानें पूर्ण भरलेलीं असून गिऱ्हाइकांचीही गर्दी होती. विशेषतः फुलें विकणारी व घेणारी मंडळी पाहून फार आश्चर्य वाटलें. आपल्या इकडल्यापेक्षां **म्हैसुरी** लोकांस फुलांची आवड जास्त असावी असें वाटतें.

**म्हैसूर** हें शहर बरेंच मोठें असून त्याची रचनाही फार चांगली आणि शास्त्रशुद्ध केली आहे. टुमदार, स्वच्छ, मोठमोठ्या रस्त्यांचें भव्य इमारतींनीं भरलेलें **म्हैसूर**सारखें दुसरें शहर सबंध **हिंदुस्थानांत** माझ्या पाहाण्यांत आलें नाहीं. **जयपूर** शहराची बांधणी पायाशुद्ध असली, तरी स्वच्छतेच्या कामांत तें **म्हैसूरच्या** मागें आहे. **मुंबई, कलकत्ता** ह्या शहरांच्या कांहीं रस्त्यावर तर इतकी घाण आहे कीं येथें राहाणें नको. असो. मार्केटसमोरूनच एक रस्ता **म्हैसूरच्या** महाराजांच्या वाड्याकडे जातो. महाराजांचा वाडा सात मजली आहे. ठिकठिकाणीं पोलीस उभे राहिलेले दिसत होते. एवढ्या सात मजली वाड्यांत राहाणाऱ्या राजाच्या नशिबांत पुत्रसुख नसावें त्याबद्दल खेद वाटला. कारण **गृहरत्नानि बालकाः**. परंतु ह्या गोष्टी परमेश्वराधीन आहेत. व एकाद्या मनुष्यास परमेश्वरानें सर्व सुखें दिल्यास तो परमेश्वराची आठवण करणार नाहीं. म्हणूनच बहुधा परमेश्वर प्रत्येकांत कांहींतरी उणेपणा ठेवीत असावा. राजवाड्याजवळच **सयाजीरोड** नांवाचा एक मोठा रस्ता आहे. श्री. **सयाजीराव महाराज** ह्यांनीं **म्हैसूरला** भेट दिली होती, तिच्या स्मरणार्थ हा रस्ता

बांधला आहे. ह्या रस्त्याच्या जवळच **लॅन्सडाउन्** बझार नांवाची एक पेठ आहे. येथून **चामुंडी** टेकडी जवळच दिसत होती. परंतु जाऊन परत येण्यास सुमारें ४।५ तास लागले असते व जाऊन येऊन ७।८ मैल चालावें लागलें असतें. इतका पळा पायांनीं गांठणें वकीलसाहेबांस त्रासदायक झालें असतें म्हणून आम्ही झटका करण्याचा विचार केला. ह्या टेकडीवर जाण्यास मोटारचा रस्ता असून पायऱ्यांची पायवाटही आहे. सुमारें एक हजार पायऱ्या आहेत मोटारला भाडें फार पडलें असतें. कारण इतर ठिकाणासारखी बस सर्व्हिस ह्या टेकडीवर जाण्यास नाहीं. झटका जाऊनयेऊन २॥ रुपयांस ठरविला. **डोडाकेरी** नांवाच्या सुंदर तलावाच्या कांठानें झटका चालूं लागला. झटकेवाला



**डोडाकेरी आणि चामुंडी टेकडी यांचा देखावा.**

मुसलमान असल्यामुळें त्यास हिंदी समजे, म्हणून त्याचा आम्हांस गाईडप्रमाणेंही उपयोग झाला. हिंदू असता तर त्यास कानडीशिवाय कांहीं समजलें नसतें. त्याचा आम्हांस कांहींच उपयोग झाला नसता. तलाव सोडल्यानंतर आमचा झटका **झुऑलाजिकल गार्डन** सोडून **पोलो ग्राउन्डच्या** रस्त्यास लागला. पोलो ग्राऊन्डचा रस्ता इतका उत्तम आहे कीं अशा प्रकारचे रस्ते मोठमोठ्या बागांतही दृष्टीस पडणार नाहींत. रस्त्याच्या दोहों बाजूंस सुंदर रंगीबेरंगीं झाडें लावलीं असून त्यांच्या खालची जमीन गवतानें हिरवीगार बनविली होती. **पोलो ग्राउन्ड** सोडून थोडें पुढें जातों तों डाव्या हातास सुमारें २

फर्लांगांवर एक सुंदर इमारत दिसूं लागली. चवकशी करितां तो महाराजांचा **समर पॅलेस** नांवाचा राजवाडा आहे असें समजलें. त्यानंतर टेकडी चढण्यास



टेकडीवरून दिसणारा म्हैसूरच्या राजवाड्याचा देखावा.

सुरवात झाली. मोटारीचा रस्ता व पायवाट हीं परस्परविरुद्ध दिशांस आहेत. म्हणून आम्हांस पायवाट लागलीच नाहीं. पायवाटेनें गेल्यास १००० पायऱ्या

चढून जावें लागतें. हिचें नांव जरी टेकडी आहे तरी ही बरीच उंच आहे. गाडीनें सुमारें ४ मैल चढावें लागतें. सुमारें ३ मैल गेल्यानंतर एक लहानसा बंगला लागला. ह्या बंगल्यासमोर एक लहानशी बाग असून त्या बागेंत वर्तुळाकार लोखंडी रुळावर तयार केलेल्या दोन झोंपड्या होत्या. ह्या सूर्य ज्या दिशेस उगवला असेल तिकडे पाठ करून बसतां येईल अशा फिरवितां येण्याची सोय केली होती; तो बंगला पाहून चालूं लागलों, तों टेकडीच्या माथ्यावर येऊन पोहोंचलों. **चामुंडी** हें **काली देवीचें** नांव आहे. पूर्वी ह्या ठिकाणीं माणसांचे सुद्धां बळी देवीस दिले जात असत. परंतु आतां मात्र कोणत्याही पशूची सुद्धां हत्या होत नसावी, असें वाटतें. कारण **कलकत्त्याच्या कालीदेवीच्या** देवळाजवळ जसें मेंढरेंकोंकरें मारून टाकिल्यामुळें जिकडेतिकडे रक्ताचे सडे पडलेले दिसतात, मारण्याकरितां मेंढरांचे कळपच्या कळप दिसतात, तसा कांहींच देखावा येथें दिसला नाहीं. **चामुंडी** देवीच्या देवळाजवळ एक **महाबळेश्वर** नांवाचें **शंकराचें** देऊळ आहे. दोन्ही देवळें जुन्या बांधकामाचे नमुने ह्या दृष्टीनें प्रेक्षणीय आहेत. **चामुंडीच्या** देवळांत जातों तों बाराचा सुमार झाला होता. देवीस नैवेद्य दाखविण्याचें काम सुरू होतें. ही देवी **म्हैसूरच्या** महाराजांची कुलस्वामिनी असल्यामुळें तिची बरदास्त फारच चांगली ठेवण्यांत आली आहे. वरती वसति फारशी नाहीं; परंतु एक खाणावळ वरतीं आहे अशी बातमी लागली होती. परंतु तिचा उपयोग करून घेण्याचा बेत रहित करून प्रथम महाराजांचा टेकडीवर जो वाडा आहे, तो पहाण्यास गेलों. वाडा लहानसाच, पण फार सुंदर बांधला आहे. वाडा पहाण्यास परवानगी नसते; परंतु त्या वेळीं महाराज तेथें नव्हते म्हणून कांहींतरी पोस्त मिळेल ह्या आशेनें रखवालदारानें वाडा दाखविला व आम्हीही त्याची यथाशक्ति संभावना केली. वाड्यांत ठिकठिकाणचे अनेक फोटो काढून ठेविलेले आहेत. वाड्यांतून **म्हैसूर** शहराचा देखावा चांगला दिसतो व तो जास्त स्पष्ट दिसावा म्हणून एक मोठी दुर्बिणही वाड्यांत ठेविली आहे. महाराजांच्या लिहिण्याच्या खास टेबलावर श्रीमत् **रामकृष्ण परमहंस** ह्यांची तसवीर ठेविली आहे. **महाराजांना सुद्धां मनःस्वास्थ्याकरितां श्री रामकृष्ण परमहंसांना शरण जावें लागतें, ह्यावरून संपत्ति हेंच सर्व सुखाचें साधन समजणाऱ्या लोकांनीं पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे.** राजवाड्यांत श्रीमत् स्वामी **विवेकानंद**, श्रीमत् स्वामी **रामतीर्थ** इत्यादि महान् पुरुषांचे फोटोच आढळले. छचोर चित्रें दिसलीं नाहींत.

ह्यावरून सुद्धां महाराज चांगल्या प्रवृत्तीचे असावेत हें अनुमान सहज काढितां आलें. वाडा पाहून परतलों तों झटकेवाल्यास नंदीकडे घेऊन जाण्यास सांगितलें. कारण **चामुंडी**पुढील नंदी देवीच्या देवळापासून २ फर्लांगांवर आहे. तो म्हणाला, नंदीकडे पायवाट जाते, तिनें तुम्ही चालत जा व नंतर पायींच मोठ्या सडकेस येऊन मिळा. मी सडकेनें जाऊन तुमची वाट पहात बसतों. मोठ्या सडकेनें गेल्यास नंदीकडे दुसरा एक गाडीरस्ता वळतो व त्यामुळें आणखी २ मैल हेलपाटा पडला असता. नंदीस नेऊन आणण्याचा आम्ही ठराव केला नव्हता. कारण आम्हास वाटलें तो वाटेवरच असेल. टांगेवाल्यास पुढें जाण्यास सांगून आम्ही पायींच निघालों, तों सुमारें २०० पायऱ्या उतरून नंदीजवळ येऊन पोहोंचलों. सदर नंदी एका मोठ्या दगडाचाच तयार केला आहे. नंदीची उंची सुमारें १६–१७ फूट आहे. इतक्या उंचीचा व इतका प्रमाणशुद्ध नंदी माझ्या पाहाण्यांत दुसऱ्या कोठें आला नाहीं. नंदीच्या गळ्यांत घुंघुरमाळा कोरलेल्या आहेत, पायात तोडे आहेत. सर्व गोष्टींनीं परिपूर्ण असा हा नंदी आहे. नंदी पाहून मोठ्या रस्त्याला मिळणारा रस्ता शोधूं लागलों. एक साधारण पायवाट सुमारें १०० पायऱ्या उतरल्यानंतर लागली. तिनें सुमारें अर्धा तास चाललों तरी मोठ्या वाटेचा पत्ता लागेना. वरतीं चढून पुन्हां चवकशी करणें शक्यच नव्हतें. कारण एकाचा सुमार झाला होता. पोटांत अन्न नव्हतें. कसेंबसें त्याच रस्त्यानें चालून खालीं आलों व मोठ्या रस्त्यावर टांग्याची वाट पहात सुमारें १॥ तास बसलों. तो आमची वाट पहात वरती थांबला. सरतेशेवटीं तीनच्या सुमारास चालूं लागलों. वरतीं जाणाऱ्या टांग्याबरोबर आमच्या टांगेवाल्यास निरोप दिला कीं, आम्ही **झूऑलाजिकल** गार्डनमध्यें जात आहोंत तिकडे ये. सुमारें १ मैल चालल्यानंतर आम्हांस उन्हामुळें फार त्रास झाल्यामुळेंच कीं काय "थंडी सडक" नांवाची एक सडक लागली. सडक चांगली ३।४ फर्लांग लांब होती. सडकेच्या दोन्ही बाजूंस खांब असून वरती तारांचें छप्पर होतें व त्या छपरावर सुंदर वेल सोडले होते. म्हणून त्या सडकेनें चालतांना अतिशय थंड वाटत होतें. थंडी सडक संपल्यानंतर महाराजांची घोड्यांची पागा लागली. आंत शिरावें कीं न शिरावें असा विचार करितों, तोंच आम्ही परदेशी पाहून एका मनुष्यानें येऊन पागा पाहाण्यास चला दाखवितों, म्हणून सांगितलें. अर्थात् त्याच्याबरोबर निघालों. कांहीं शुभ्र पांढरे, कांहीं पांढऱ्या वर्णाचे परंतु काळ्या कानांचे असे नाना प्रकारचे घोडे पाहिले. घोड्यांची एकंदर व्यवस्था फार

उत्तम ठेवलेली दिसली. कांहीं कांहीं घोडयांना सलाम करण्यास शिकावल होतें. त्यांनीं आम्हांस लवून सलाम केला. अर्थात् त्यांच्या शिक्षकांनींही आम्हांस सलाम करून घोडयांच्या सलामाचें वक्षीस उपटलेंच. एके ठिकाणीं घोडयास घालण्याचीं जिनें, लगाम, रिकिबी निरनिराळ्या प्रकारचे चाबूक, घोडयाचे अलंकार वगैरे जिन्नस ठेविले होते, तेही पाहाण्यास मिळाले. तेथून जवळच **झुऑलॉजिकल** गार्डन आहे. तींत शिरलों. ह्या बागेंत सर्व प्रकारचे रानटी पशू तर आहेतच, परंतु विशेष म्हणजे कांगरू नांवाचे प्राणी आहेत. ह्या प्राण्यास ४ पायच असतात, परंतु पुढील दोन पायांचा त्यास चालण्याच्या कामीं उपयोग करितां येत नाहीं. त्याऐवजीं हा प्राणी शेंपटीचा उपयोग करितो. त्यामुळें त्यास उडया मारीत चालावें लागतें, व आपलें पोर ठेवण्याकरितां छातीजवळ एक परमेश्वरनिर्मितच पिशवी असते. सर्व बाग लवकर पाहून होणें शक्यच नव्हतें. तरीहि शक्य तितकी पाहून परतलों. बागेच्या तोंडाशींच एक कॉफीचें दुकान आहे. त्यांत कॉफीपान केलें. बाग ४ ते ६ दुपारीं उघडी असते. बाहेर पडलों तों ६ चा सुमार झाला होता. **चामुंडी** टेकडीवर आमची चुकामुक झाल्यामुळें टांगेवाल्यास आम्हीं बागेंत येण्याचा निरोप दिला होता, त्यप्रमाणें तो बागेंत आला. त्याचा सबंध दिवस गेला व आम्हालाहि त्रास झाला. जर त्यानें नंदीजवळ आम्हास टांग्यांतूनच पोहोंचविलें असतें, तर चुकामूक झाली नसती. नंदीच्या वरच्या बाजूस कांहीं पायऱ्या चढून गेल्यानंतर मोटारची सडक लागते. आम्ही कांहीं पायऱ्या उतरून सडकेच्या शोधास लागलों, हें कसें जमणार? असो; पुन्हां टांग्यांत बसलों. जर टांगेवाला भेटला नसता, तर पोलिसकडे आम्ही जाऊन झालेल्या हकीकतीची वर्दी देणार होतों. कारण श्री. **नानासाहेब वकील** असल्यामुळें त्यांस कायदे माहीत होते. नसतें संकट परदेशांत आंगावर यावयाचें. नाहींतर जर टांगेवाल्यानें दोन माणसांनीं मजला फसविलें, अशी वर्दी आमची चवकशी करण्यापूर्वीं दिली असती, तर आम्हांस पोलीस ऑफिसकडे उगाच जादा हेलपाटे मारावे लागले असते व दिवसहि मोडले असते. परंतु तो ताप परमेश्वरी कृपेनें चुकला. फक्त उपाशी उन्हांतून अनवाणी प्रवास करावा लागला. कारण पादत्राणें टांग्यांत ठेवलीं होतीं. टांग्यांतून प्रथम **निषादबाग** नांवाच्या बागेंत गेलों. बागेंत झाडी चांगली गर्द असून ठिकाठिकाणीं बाकें मांडलीं असून त्यावर मंडळी हवा खाण्यास बसली होती. बाग जरी म्हणण्यासारखी सुंदर नसली, तरी वाईट मात्र खास नाहीं. तिला नांव मात्र **काश्मीरच्या निषाद बागेचें** दिलें आहे. तें अयथार्थ आहे, इतकेंच.

बागेंतून पुढें गेलों, तों एक सहा रस्ते फुटलेली मोठी वर्तुळाकार जागा लागली. ह्या ठिकाणास हार्डिंज सरकल असें नांव आहे. हेंहि ठिकाण रम्य आहे. तेथून



चामुंडी टेकडीवरील नंदी.

पुढें दिवे लागल्यामुळें मोठी मजा दिसूं लागली. एका बाजूस दूर अंतरावर सारखी दिव्यांची रांगच रांग दिसत होती. चवकशी करितां ती **चामुंडी**

टेकडीवरील दिव्यांची रांग होय असें समजलें. गांव तर काय दिव्यांनीं फुलून गेलें होतें. **बॉम्बे आर्यभुवन**मध्यें भोजन करून धर्मशाळा गांठली. (३०-१२-३० रोजीं) सकाळीं उठून स्टेशनचा रस्ता धरला. आज **नांजनगूड** येथील देवालय पहाण्यास आगगाडीनें जाण्याचा विचार होता. **म्हैसूर**पासून **नांजनगूड** अंतर १६ मैल असून भाडें ४॥ आणे पडतें. सकाळीं ७ वाजतां निघालों, ते ८ वाजतां **नांजनगूडला** पोहोंचलों.

**नांजनगूड** स्टेशनवर उतरून देवळाच्या रोखानें चाललों. गांवाची लोकसंख्या ७४५३ आहे. गांव स्वच्छ दिसून आलें. **शिवसमुद्रावरून** कोलारच्या खाणीकडे जाणाऱ्या विजेच्या तारा ह्या गांवाजवळून गेल्यामुळें ह्या गांवासही विजेची सोय झाली आहे. ह्या लहानशा गांवांत विजेची रोषनाई पाहून आश्चर्य वाटलें. अगदीं आरंभीं सार्वजनिक वाचनालयाची इमारत लागली. इतकी सुंदर, स्वच्छ, **नीटनेटकी** व व्यवस्थित इमारत ब्रिटिश हिंदुस्थानांतील इतक्या लहान गांवांत वाचनालयाकरितां असलेली माझ्या आढळण्यांत आली नाहीं. परत जाणारी गाडी १२॥ ची होती म्हणून कांहीं वेळ वाचनालयांत वाचीत बसलों. घरचीं पत्रेंही लिहिलीं. देशी व इंग्रजी मिळून सुमारें १५।२० वर्तमानपत्रें येतात. गर्दीही बरीच होती. गांवांत खाणावळीही होत्या. नंतर **शंकरमठ** नांवाचें एक ठिकाण लागलें. ह्या ठिकाणीं भस्माचे पट्टे लावून विद्यार्थी वेदपठण करीत बसले होते. त्यांना तेथें जेवण फुकट मिळतें असें समजलें. नंतर देवळांत प्रवेश केला. आरंभींच मोठें गोपूर लागलें. त्यानंतर आंत मोठें देऊळ लागलें. देवळाची लांबी ३८५ फूट व रुंदी १६० फूट आहे. सर्व देवळासभोंवतां कोट आहे. त्यावर व देवळाच्या भिंतीवर जिकडेतिकडे मूर्तिच मूर्ती कोरल्या आहेत. व त्यांच्या खालीं त्यांचीं नांवेंही घातलीं आहेत. मूर्तींचें खोदकाम पाहण्यांत वेळ कसा निघून गेला तें समजलें सुद्धां नाहीं. देऊळ शंकराचें असून त्याचें नांव **नांजनगुडेश्वर** असें आहे. प्रदक्षणेच्या मार्गावर घाण आढळलीच. देवळास सुमारें १४० खांब आहेत. वार्षिक उत्पन्न २०००० रुपयांचें आहे. माघ महिन्यांत ह्या देवाच्या रथाची मिरवणूक निघते, त्यावेळीं सर्व दक्षिण हिंदुस्थानांतून यात्रेकरू येतात. देवाचें दर्शन घेऊन परतलों, तो कॉफी क्लबमध्यें जाऊन पोटपूजा करून स्टेशनवर गेलों व १२ वाजतां गाडींत बसून १॥ च्या सुमारास **चामराजापुरम्** नांवाच्या **म्हैसूरच्या** अलीकडील स्टेशनवर उतरलों. कारण **म्हैसूरचे** निरनिराळे भाग

पहावयाचे होते.चालत चालत **जगमोहन पॅलेस** व **चित्रशाळा** नांवाचें ठिकाण पहावयास गेलों.हा राजवाडा पाहण्यास माणशीं २ आणे फी द्यावी लागते.३ वर्षांच्या मुलापासून १२ वर्षांच्या मुलापर्यंत १ आणा फी घेतात. वाडा रविवार व गॅझेटेड सुट्यांशिवाय रोज सकाळीं ७॥ ते ११ व दुपारीं २ ते ५ पर्यंत उघडा असतो. म्हणून 'आम्हांस थोडें थांबावें लागलें. आंत शिरल्याबरोबरच एक मोठा दिवाणखाना लागला. त्यांत **म्हैसूरचे** पहिले राजे **कृष्णराज** ह्यांच्या दरबाराचीं चित्रें असून हस्तिदंती सामानही प्रेक्षणीय आहे. दुसऱ्या दिवाणखान्यांत **म्हैसूरच्या** राजांना वेळोंवेळीं मिळालेलीं मानपत्रें, त्यांचे करंडक वगैरे जिन्नस ठेवून दिले आहेत. एका दिवाणखान्यांत **म्हैसूर**मध्यें होऊन गेलेल्या मोठमोठ्या दिवाणांचीं चित्रें लाविलीं आहेत. एका दिवाणखान्यांत इंग्रजांचीं **टिपूशीं** जीं युद्धें झालीं त्यांच्या तसबिरा लावल्या आहेत. अशा अनेक गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. एका दिवाणखान्यांत **म्हैसूरचा** उठावाचा नकाशा आहे. त्यावरून **म्हैसूर** संस्थानची चांगलीच कल्पना येते. मुख्य इमारत तीन मजली आहे. वरच्या मजल्यावर जाण्याचे रस्ते बंद असतात. आम्हांस पहिला मजला पाहून इतकेंच पहावयाचें असें वाटलें. परंतु एका द्वाररक्षकानें वरचा मजला उघडून दिला. मग वरतीं जाऊन तीनही मजले पाहून आलों. वरतीही अनेक वस्तू ठेवल्या आहेत. महाराजांना सूत काढण्याकरितां महात्मा गांधींनीं बक्षीस दिलेला चरखा आहे व जवळच एक भला मोठा दगडी चौरंगही आहे. त्याची लांबी ८ फूट, रुंदी ६फूट असून उंची २ फूट आहे. उतरल्याबरोबर दरवाजा उघडून देणारा सलाम करून उभा राहिला. अर्थात् त्याची योग्य संभावना करावी लागली. मुख्य इमारतीच्या बाहेरच्या बाजूंस इंडियन ग्यालरी नांवाचा एक भाग आहे. त्यांत पूर्वकाळचीं अनेक चित्रें पाहण्यासारखीं आहेत. सर्व पहातां पहातां ५ वाजले, म्हणून परतलों व फिरत फिरत खाणावळींत गेलों. इकडे लोकांचा मोठमोठ्या शेंड्या ठेवण्याचा प्रघात आहे म्हणून त्यांस रोज केसांस तेल लावून ते साफ ठेवावे लागतात. गरीब लोक केस ठेवतात पण त्यांस तेल व केसांची निगा ठेवण्यास अवसर सांपडत नसल्यामुळें डोक्यांतील उवा काढण्याचें काम सारखें चालू असतें. खाणावळींत With oil bath 13 Rs. व without oil bath 12 Rs. असे दर लिहिले होते.


ता. ३१।१२ रोजीं सकाळीं स्टेशनवर आलों. स्टेशनवरून **उटकमंड**, **कूर्ग**प्रांताची राजधानी **मरकारा** वगैरे ठिकाणीं जाण्यास मोटारगाड्या

मिळतात. आगगाडीनें गेलें असतां **उटकमंडला** ५।६ रुपये भाडें पडतें. परंतु मोटार अवघ्या ३ रु. स मिळत होती. उटकमंडला जावें अशी फार इच्छा झाली, परंतु वेळ नसल्यामुळें बेत रहीत करून **श्रीरंगपट्टणचें** आगगाडीचें तिकीट घेतलें. श्रीरंगपट्टणला गांवांतून मोटारी सुटतात; परंतु रेल्वेपेक्षां भाडें जास्त पडतें म्हणून आम्हीं रेल्वेनेंच जाण्याचें ठरविलें. **म्हैसूर** ते **श्रीरंगपट्टण** अंतर ९ मैल आहे. भाडें ३ आणे पडतें. ७–१० ला गाडींत बसलों ते ७–४० ला उतरलों.

**श्रीरंगपट्टण** हें एक **कावेरी** नदीमधील तीन मैल लांब व १ मैल रुंद असें बेट आहे. **श्रीरंगपट्टणचें** नांव लहानपणापासून ऐकत आलों आहे, परंतु तें पाहण्याचा योग येईल अशी मात्र कल्पना नव्हती. ह्या बेटासभोंवतीं बऱ्याच भागावर तट वगैरे बांधून त्यांत **म्हैसूरचा** वाघ **टिपू** सुलतान राहात असे. १७९१ सालच्या इंग्रजांबरोबर झालेल्या लढाईत टिपूचा पराभव झाल्यामुळें त्यानें आणखी एक तट बांधून व नंतर खंदक म्हणून संरक्षणाची दुहेरी व्यवस्था केली होती तरीही तो किल्ला इंग्रजांनीं काबीज केलाच. असें इतिहासप्रसिद्ध ठिकाण पाहण्याची फार इच्छा लहानपणापासून होती व ती **श्रीरंगजीच्या** कृपेनें पारही पडली. स्टेशनच्या बाहेर पडतों तों समोरच **श्रीरंगजीचें** देऊळ लागलें. आरंभीं मोठें गोपूर असून आंत शिरल्याबरोबर मुख्य देवळाचा सभामंडप लागतो. सभामंडपांत गेल्याबरोबर, समोरच शेषशाई भगवानाची चांगली १०।१२ फूट लांबीची भलीमोठी झोपीं गेलेली काळ्या पाषाणाची मूर्ति लागते. डाव्या हातासही एक मूर्ति असून तिची पूजा चालली होती व तिच्या दर्शनाची वाट पहात बरेच यात्रेकरू देवळांत बसले होते. परंतु त्या मूर्तींची पूजा पडद्याच्या आंत चालली असल्यामुळें आम्हांस दर्शनाकरितां थांबावें लागलें असतें; परंतु सर्व ठिकाणें पाहून ११॥ ची गाडी सांपडणें कठीण असल्यामुळें परत येतांना वेळ असल्यास मूर्ति पाहून जाण्याचा विचार करून बाहेर पडलों. गाडींतून आमच्याबरोबर बरीच मंडळी उतरली होती. परंतु त्यांपैकीं शें. ९० मंडळींचें ध्येय **कावेरीचें** स्नान व **श्रीरंगजीचें** दर्शन इतकेंच असल्यामुळें त्यांस बसणें अवश्य होतें. देवळाच्या बाहेर थोडें डाव्या हातास **कावेरीचें** मोठें पात्र असून त्यावर घाट वगैरे चांगले बांधले आहेत. त्या ठिकाणीं मंडळी स्नानें करीत होती. देवळाच्या समोरच "**चामराजेंद्रछत्रम्**" नांवाची उत्तम धर्मशाळा आहे. आम्हांस हें अगोदर माहीत असतें तर आम्ही बंगलोरहून येतांनाच येथें उतरलों असतों. म्हणजे परत जाण्यायेण्याचा खर्च वांचला असता. छत्र डाव्या

हातास टाकून निघालों. सुमारें एक मैल चालल्यानंतर एक मशीद लागली. मशीद फारशी मोठी नाहीं; परंतु त्या मशिदींत जे दोन मनोरे आहेत ते मात्र मोठे आहेत. मनोऱ्यांच्या वरती चढण्यास आंतून वाटोळा जिना आहे. वरती जाण्याचे दरवाजे बंद केलेले होते; परंतु रखवालदारावर द्रव्याचा प्रयोग करून आमच्या अगोदर आलेल्या मंडळींनीं ते उघडले होते. अर्थात् आम्ही आंत शिरलों व वरती गेलों. वरून सर्व **श्रीरंगपट्टण** बेटाचा देखावा फार चांगला दिसतो. पुढें गेलेली मंडळी खालीं उतरून परत गेली. रखवालदारास वरती कोणी नसावें असें वाटलें म्हणून म्हणा, कीं मुद्दामच म्हणा, परंतु त्यानें दार बाहेरून लावून घेतलें. खालीं येतों तों दरवाजा बाहेरून बंद. बरीच हाकाहाक केल्यानंतर दरवाजा उघडला. त्यामुळें थोडें वेळेचें नुकसान झालें. कारण परत जाण्यास एक गाडी ११॥ ची असून दुसरी संध्याकाळीं ७ ची होती. मशिदी-वरून उतरल्याबरोबरच मोठा दरवाजा लागतो व **श्रीरंगपट्टणचे** तीनही तट दिसतात. तट व खंदक पाहून चालूं लागलों. सुमारें १।२ फर्लांग चालल्या-नंतर सुप्रसिद्ध **दर्यादौलत**महाल नांवाच्या **टिपु** सुलतानाच्या आवडत्या ठिकाणीं येऊन दाखल झालों. हा **दर्यादौलतमहाल कावेरी** नदीच्या तीरावर आहे; सभोंवतीं अतिशय सुंदर अशी बाग आहे. बागेंत तऱ्हेतऱ्हेचीं झाडें आहेत. विशेषतः कांहीं झुडपांस आरामखुर्च्यांचा आकार दिला आहे. कांहीं हत्तीच्या आकाराचीं कापलीं आहेत तर कांहीं लहानशा झोपड्यांसारखीं आहेत. आंब्याची दाट झाडी असल्यामुळें बागेंतून हलूंच नये असें वाटतें. मुख्य महालाची इमारत तीन मजली आहे. पहिल्या मजल्यावर आंतीलबाहेरील बाजूंस चित्रेंचचित्रें काढलीं आहेत. कांहीं लढाईचीं, कांहीं दरबारांचीं, कांहीं नाचांचीं, अशीं अनेक रंगीबेरंगी चित्रें पाहण्यांत वेळ केव्हांच निघून जातो. सर्व चित्रें पूर्वकालचीं आहेत. खालचा भाग पाहून वरतीं गेलों. वरतीं दरबाराची जागा आहे. कोचें, खुर्च्या जिकडेतिकडे मांडलेल्या होत्या. कांहीं प्रेक्षक त्यांवर बसून आराम करीत होते. आम्हांस घाई असल्यामुळें तिसऱ्या मजल्यावर कांहीं आहे कीं काय तें पाहून परतण्याचें ठरविलें. तिसऱ्या मजल्यावर फक्त गच्ची आहे. महालाच्या बाहेर पडलों तोंच डाव्या हातास Gumbaz नांवाची पाटी लागली. त्या रस्त्यानें निघालों. सुमारें २ फर्लांग चालल्यानंतर उजव्या हातास एक मोठा पांढरा स्तंभ उभारलेला दिसला. तेव्हां त्याच ठिकाणीं **हैदर** व **टिपू** ह्यांच्या कबरी असाव्या अशी कल्पना केली. नंतर एक Monument ह्या नांवाची पाटी सुद्धां लागली.

म्हणून त्या रस्त्यास लागलों. वास्तविक सडक सोडण्याचें कारण नव्हतें. सडक सरळ **हैदराच्या** कबरीपर्यंत गेली आहे. त्या मान्युमेंटपाशीं जाऊन पाहिलें




फ्रेरळ फाउंटन लॅन्सडाउन बझार, म्हैसूर.

तों दुसरें तिसरें कांहीं नसून एक मोठा पांढरा स्तंभ एका इंग्रजाच्या स्मरणार्थ उभा केला आहे. असें आढळून आलें आमचा वेळ मात्र उगाच फुकट गेला. ..

त्यामुळें पुन्हां रस्त्यास येऊन मिळावें लागलें. **दर्यादौलतपासून** सुमारें १–१॥ मैल चालल्यानंतर **गंजम** नांवाचें गांव लागलें. गांव साधारण लहानच आहे. वस्ती वगैरे स्वच्छ दिसली. गांव संपल्यानंतर मग **गुम्बझ** नांवाचें ठिकाण आलें. ह्याच ठिकाणीं **हैदर अल्ली, टिपूची** आई व **टिपू सुलतान** ह्यांच्या कबरी आहेत. ही इमारत चौकोनी आहे. ह्या इमारतींत मुख्य पाहण्यासारखी गोष्ट म्हणजे काळ्या गुळगुळीत दगडाचे इमारतीचे खांब. ह्या खांबांस सुमारें १५० वर्षे झालीं असूनही ते अगदीं नव्यासारखे दिसतात व तकतकीत तर इतके आहेत कीं त्यांत आरशाप्रमाणें आपलें तोंड दिसतें. दरवाजे लाकडी असून त्यांवर हस्तिदंताचें काम केलें आहे. मधोमध तीन कबरी असून त्यांवर उंची आच्छादनें पसरलेलीं असतात. मशिदीच्या सभोंवार सुंदर बाग असून तीमधील रस्तेही रेखीव आहेत. परंतु १०॥ चा सुमार झाल्यामुळें फारसें न थांबतां स्टेशनचा रस्ता सुधारला. आमच्या सुदैवानें **दर्यादौलत**पर्यंत आल्याबरोबर **म्हैसूरला** जाणारी मोटार भेटली. अर्थात् माणशीं ६।६ आणे देऊन तींत बसलों. नाहींतर गाडी चुकली असती तर ६ तास स्टेशनवर रखडावें लागलें असतें. स्टेशनजवळ असलेलें **रंगजीचें** देऊळ अगोदरच पाहिलें असल्यामुळें मोटारींत बसतांना तें राहून गेल्याचीही हळहळ वाटली नाहीं. धर्मशाळेंत दुपारीं १ च्या सुमारास येऊन पोहोंचलों व तेथून सामान घेऊन स्टेशनवर आलों.

**म्हैसूरहून** दुपारीं ३–५५ ला **बेलागुडा** नांवाच्या **म्हैसूर**पासून ७मैलांवर असलेल्या स्टेशनास जाण्यास गाडी सुटते तींत बसलों. व ४॥ वाजतां बेलागुडाला उतरलों. **बेलागुडा** येथून सुमारें २।–२॥ मैलांवर **कृष्णराज सागर** नांवाचें ठिकाण आहे. तें पाहण्याच्या उद्देशानें आलों होतों. येथें धर्मशाळा वगैरे असेल अशी आम्ही कल्पना केली होती. परंतु चवकशी करितां धर्मशाळा तर नाहींच, परंतु पाणीसुद्धां स्टेशनपासून दोन तीन फर्लांगांवर आहे असें समजलें. आमच्याबरोबर बरेंच सामान होतें. अर्थात् क्लोकरूम वगैरे स्टेशनला नव्हतीच. तेव्हां तें कोठें ठेवावें असा प्रश्न पडला. परंतु स्टेशनमास्तर फार थोर गृहस्थ होते. त्यांनीं स्टेशनमध्यें सामान ठेवण्यास परवानगी दिली. माणशीं २ आण्यांप्रमाणें भाडें देऊन मोटारनें **कृष्णसागर** येथें जाऊन पोहोंचलों. येथें एक **डाकबंगला** मोठ्या लोकांना उतरण्याकरितां बांधला आहे. बाकी जवळपासची सर्व वस्ती बंधाऱ्यावर काम करणाऱ्या लोकांचीच आहे. धर्मशाळा वगैरे कोठें दिसली नाहीं. **कृष्णराजसागर** हा **कावेरी** नदीस मोठा बंधारा बांधून तयार केलेलें

एक सरोवर आहे. सदरहू बंधारा हें जगांतील मोठ्या कामांपैकीं एक काम आहे. ह्या बंधाऱ्याची लांबी ८६०० फूट असून उंची १२४ फूट आहे. काम १९११ सालीं सुरूं



शिवसमुद्र येथील पाण्याच्या नळांचा देखावा.

झालें. तरी अजूनही बांधण्याचें काम सुरूंच आहे. आतांपर्यंत बांधण्याच्या कामीं सुमारें ३ कोट रुपये खर्च झाले असून आणखी २ कोट रुपये खर्च व्हावयाचे आहेत. हा

बंधारा बांधण्याचीं मुख्य तीन कारणें आहेत. ( १ ) **कावेरी** नदीस उन्हाळ्यांत पाण्याचा तुटवडा पडतो तो पडूं नये. ( २ ) सध्यां **शिवसमुद्र** येथें उत्पन्न होणारी वीज मागणीपेक्षां कमीच आहे, आणि उन्हाळ्यांत तर कावेरीच्या पाण्याचा सांठा कमी झाल्यामुळें आणखी कमी होते. म्हणून ह्या सरोवराच्या पाण्याच्या जोरावर ३२००० अश्वशक्तीच्या विजेचा आणखी पुरवठा करावा. (३) कालवे काढून जमीन सुपीक करावयाची. सर्व पाण्याचा चौथा हिस्सा विजेकरितां ठेऊन बाकीचें कालव्याच्या उपयोगास आणावयाचें आहे. अर्थात् यामुळें म्हैसूरची भरभराट आणखी होईल. हें काम पाहून राजाच्या प्रजाहिताकरितां चाललेल्या खटपटीबद्दल कौतुक वाटतें. आणि म्हणूनच ह्या बंधाऱ्यामुळें तयार झालेल्या तलावास **कृष्णराजसागर** हें हल्लींच्या राजाचें नांव दिलें आहे. आम्हीं पोहोंचलों, तों संध्याकाळ होत आली होती. बंधारा डाव्या हातास टाकून खालीं नदीकडे उतरण्यास सुरवात केली. बंधाऱ्यापासून खालीं नदीच्या पात्रापर्यंत एक सुंदर बाग तयार करण्याचें काम चालू आहे. ही बाग पाहून **काश्मीरच्या निषादबागेची** आठवण झाली. कारण जरी **निषादबागेइतकीं** सुंदर, निरनिराळ्या प्रकारचीं झाडें येथें अद्याप तयार झालेलीं नसलीं तरी पाटानें प्रत्येक मजल्यावर धबधबे व हौद तयार करून पाणी मात्र (**निषादबागेसारखेंच** ) जिकडे तिकडे खेळविलें आहे. **निषादबागेच्या** धर्तीवर बाग तयार करण्याचा चालकांचा विचार दिसतो. बागेंतून खालीं उतरल्यानंतर बंधाऱ्याच्या मध्यभागीं एक सुंदर लहानसें देऊळ केलेलें नजरेस पडलें. देवळांत काळ्या दगडाची **कावेरीची** मूर्ति असून तिच्या हातांत एक कलश दिला होता व त्यांतून सारखें पाणी वहात होतें. तें रम्य ठिकाण पाहून वरती पायऱ्यांनीं चढून बंधाऱ्यावर आलों, तों पलीकडे समुद्रासारखें पसरलेलें तें कावेरी नदीचें पात्र दिसूं लागलें. सूर्यास्ताची वेळ असल्यामुळें आकाशांत निरनिराळ्या रंगांचे मेघ चमकत होते; व त्यांचें प्रतिबिंब पाण्यांत पडून मनास आल्हाद देत होते. तो देखावा पाहात कितीतरी वेळ उभे होतों तोंच आमची मोटार बंधाऱ्याच्या दुसऱ्या टोकास गेली होती ती परत येतांना दिसली. अर्थात् एकदम तिच्यांत जाऊन बसलों व **बेलागुडा** स्टेशनवर संध्याकाळीं ७।-७॥ च्या सुमारास येऊन दाखल झालों. मास्तरसाहेबांनीं पाणी दिलें व झोपण्याकरितां स्टेशनच्या खोलींत जागा दिली, म्हणून रात्र निभावली. नाहींतर उघड्यावर पाण्याशिवायच झोपावें लागलें असतें. बरोबर असलेल्या जिनसांच्याच फराळा-

वर भागवावें लागलें. स्टेशनवर एक फुटाण्यांचें दुकान होतें. दुसरे कोणतेही जिन्नस मिळण्यासारखें नव्हतें. **म्हैसूर स्टेट** रेल्वे ही स्वतंत्रच रेल्वे आहे. त्या रेल्वेवर




कमानी दरवाजा, गव्हर्मेंट हाऊस, म्हैसूर.

बहुधा गाड्या रात्रीचा प्रवास करीत नाहींत. मास्तरसाहेब ८ वाजतां घरीं गेले ते दुसऱ्या दिवशीं सकाळीं परत स्टेशनवर आले.

आम्हीं ता. १-१-३१ रोजीं सकाळीं ७ वाजतां **हसन** नांवाच्या गांवाकडे जाणारी गाडी पकडली. येथून **हसन** ६७ मैल असून माणशीं भाडें १ रु. ३ आ. ९ पै. पडतें. हसन येथें ११। वाजतां गाडी येऊन पोहोंचली. **हसन** हें जिल्ह्याचें ठिकाण आहे. गांवाची लोकसंख्या सुमारें९ हजार आहे. बेलूर गांवाची हवा चांगली आहे. स्टेशनच्या बाहेर पडतों तोंच बेलरकडे जाणारी मोटार मिळाली. आम्ही उतरलों त्या दिवशीं **हसन** येथें एक मोठी यात्रा भरली होती. मोटारवाल्यानें आम्हांस मोटारींत घेतलें, परंतु पुढें त्यास **बेलूरला** जाणारे पॅसेंजर मिळाले नाहींत. बाहेर गांवाहून यात्रेकरितां माणसें घेऊन आलेल्या मोटारींनीं परत जाण्यास जे थोडे पॅसेंजर मिळाले ते घेऊन मोटारी सोडल्या. आमच्या मोटारवाल्यानें आणखी १।२ तासांत मोटार सोडतों असें कांहींतरी सांगून आम्हांस आपल्या घराजवळ मोटारींत तसेंच बसवून ठेवलें. आम्हीं मोटार सुटण्याची वाट पहात बसलों. सुमारें ३ वाजतां मोटार घरून निघाली. ती इकडून तिकडे तिकडून इकडे असें करीत मोटारवाल्यानें ५ च्या सुमारास नक्की सोडण्याचें ठरविलें व पैसे मागूं लागला. आम्हांस निष्कारण त्रास दिल्याबद्दल त्यास पोलिसकडे न्यावें असें मनांत आलें, म्हणून त्यास **बेलूरला** पैसे देऊं असें सांगितलें. तो म्हणाला पैसे येथें द्या, नाहीं तर उतरा. सुमारें अर्धा तास वाटाघाट केली, पोलिसला बोलाविलें, परंतु तो मोटारवाल्यास सामील झालेला दिसला. तेव्हां पैसे देऊन त्याचा फक्त नंबर टिपून घेतला. चालूं लागलों. येथून बेलूर २४ मैल असून माणशीं भाडें १ रु. पडलें. सुमारें ६॥ वाजतां **बेलूर** येथें येऊन सुखरूप पोहोंचलों. येथें धर्मशाळा नसल्यामुळें खाणावळीच्या शोधास लागलों. एक चहाचें दुकान दिसलें. दुकानदारास इंग्रजी येत नव्हतें. आम्हांस कानडी येत नव्हतें. फक्त त्यानें छातिवर हात ठेवून मोठ्या ऐटीनें उडप्पी ब्राह्मण आहे असें सांगितलें व खुणांनीं चहा कॉफी मिळेल, परंतु भोजनाची सोय होणार नाहीं, असें कळविल्यामुळें भोजनाचें काय करावें ह्या फिकिरींत पडलों. कारण आदल्या दिवशीं दुपारीं भोजन मिळालें होतें. त्यानंतर ३० तास फराळावरच काम चाललें होतें. तेव्हां तपास करण्यास सुरवात केली. एक **वी. व्ही. गोपाळ कृष्ण शेट्टी** नांवाचे इंग्रजी जाणणारे व्यापारी भेटले. त्यांनीं एका ठिकाणीं भोजनाची सोय केली. ते म्हणाले तो गृहस्थ खाणावळीचा धंदा करीत नाहीं, परंतु तुम्हांस माणशीं ५ आण्यांप्रमाणें भोजन घालण्यास तयार आहे. त्याजकडेच जाऊन रात्रींचें भोजन उरकलें व झोपण्यास जागाही त्याजकडेच मिळविली.

दुसरे दिवशीं सकाळीं उठून **बेलूरचें** सुप्रसिद्ध देवालय पाहण्यास गेलों. **श्री. शेट्टी** बरोबर होतेच. त्यांनीं **श्री. केशव मूर्तिराव** नांवाच्या एका



बाजारचा चौक, म्हैसूर.

गृहस्थांची गांठ देऊळ दाखविण्याकरितां घालूनदिली. ते गृहस्थ कांहीं दिवस **कोल्हापुराकडे** राहात होते, त्यामुळें त्यांना मराठी चांगलेंच समजतें अशी

**बेलूरच्या** लोकांची त्यांनीं समजूत करून दिली होती. आम्हांस मात्र त्यांचें मराठी ओळखण्यास कानडइितपतच त्रास पडत होता. त्यांस मराठी साधारणपणें बरें समजे. त्यांनीं देवळाभोंवतीं असलेलें प्रत्येक चित्र कोणाचें आहे व त्याचें वैशिष्ट्य काय हें समजावून सांगितलें. देऊळ ६०० वर्षांपूर्वी बांधलेलें आहे. देवळांत व बाहेर सर्वत्र कोरीव कामाचे अनंत नमुने आहेत. बाहेरच्या बाजूस हत्तींच्या रांगांच्या रांगा खोदल्या आहेत. प्रत्येक हत्तीचे तोंडाचा आकार निरनिराळा दाखविला आहे. कांहीं ठिकाणीं घोडेस्वारांच्या फौजा कोरलेल्या आहेत. स्वारांच्या पायांत बूट, स्टॉकिंग घातलेले दाखविले आहेत. प्रत्येक मूर्तीवर अलंकार कोरले आहेत. खालपासून वरपर्यंत सर्व ठिकाणीं कोरीव काम आहे. एके ठिकाणीं इमारतीचे लहान नमुने कोरले आहेत. त्यांत नट व बोलटही सांध्याकरितां कोरून दाखविले आहेत. सर्व भारत व भागवत ह्यांतील महत्त्वाचे प्रसंग दगडावर कोरले आहेत. हें देऊळ बांधण्याचें काम बरींच वर्षें चाललें होतें म्हणतात. ह्या देवळाच्या माहितीचें इंग्रजी पुस्तक मिळतें. त्यास ५ रु. किंमत पडतें. हें देऊळ पाहण्याकरितां दूरदूरचे लोक येतात. नुकतेच **हिंदुस्थानचे** माजी व्हॉइसरॉय **लॉर्ड हार्डिंज** हे देऊळ पाहून गेले. **म. गांधी म्हैसूरला** आले होते तेव्हां तेही हें देऊळ पाहण्यास आले होते. देवळाच्या आंतील भागांतही मोठमोठ्या माणसाच्या आकाराच्या मूर्ति खोदल्या आहेत. खांब तर इतके गुळगुळीत आहेत कीं त्यांत आपलें प्रतिबिंब दिसतें. देवळाच्या आंतील बाजूस छतावर सुद्धां खोदकाम आहे. देवळांत ६ फूट उंचीची **नारायणाची** मूर्ति आहे. देवाच्या आरतीकरितां बरीच गर्दी जमली होती. देवळाच्या आवारांत आणखीं ४इतर देवळें आहेत. सर्व ठिकाणीं खोदकाम आहेच. ह्या देवळांकडे पाहून पूर्वी मूर्ति घडविण्याची कला आपल्याकडे किती ऊर्जितावस्थेस पोहोंचली होती ह्याची चांगली साक्ष पटते. व राजेलोकसुद्धां अशीं कामें करून **हिंदुस्थानांतील** कारागिरांच्या पोटाचा प्रश्न उत्तम तऱ्हेनें सोडवीत असत हें लक्षांत येतें आणि म्हणूनच '**ना विष्णुः पृथ्वीपतिः**' ही म्हण त्यांच्या संबंधांत खरी होती. आतांच्या संस्थानिकांसारखी प्रत्येक बाबतींत ते परक्यांची भर करीत नसत. तरीही आतांच्या संस्थानिकांना आपणांस प्रजेनें **विष्णूचा** अवतार **मानावें** अशी इच्छा धरण्यास कांहीं वाटत नाहीं. ह्या देवळाचें संपूर्ण वर्णन करणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें आहे. परंतु वाचकांस विनंति इतकीच आहे कीं त्यांनीं हें देऊळ एकवार जरूर पाहावें. देवळाच्या भिंतीवरील

चित्रें कागदावर काढण्याकरितां कितीतरी विद्यार्थी तेथें बसले होते. सरतेशेवटीं **श्री. केशव मूर्तिराव** ह्यांची संभावना करून त्यांचा निरोप घेतला. त्यांनीं सुद्धां " दया असावी " असें म्हणून निरोप दिला. मोटारची चवकशी करितां **हलेबीडला** जाणारी मोटार दुपारीं ४ वाजतां सुटेल असें समजलें. अर्थात् त्या गांवांतच ८ तास काढणें भाग पडलें. गांवाजवळ एक मोठा तलाव बांधला आहे, त्यांत स्नान करणें, पोहणें, कपडे धुणें वगैरे कार्यक्रम यथास्थित पार पडला. सुमारें १॥–२ वाजतां भोजन उरकलें. कांहीं वेळ विश्रांति घेतल्यानंतर मोटार आली. **श्री. शेट्टी** यांचा निरोप घेऊन व त्यांचे आभार मानून मोटारमध्यें बसलों. माणशीं भाडें ८ आणे पडलें. **बेलूर**पासून ११ मैलांवर असलेल्या **हाले-बीड** नांवाच्या गांवीं संध्याकाळीं ६ वाजतां जाऊन सुखरूप पोहोंचलों. येथें-ही खाणावळ नसेल अशी कल्पना होती; परंतु येथें खाणावळ होती. दुपारीं जेवणास उशीर झाला असल्यामुळें फारशी भूक नव्हती. थोडेसें फराळाचें माग-वून खाणावळीच्या पडवींत पथारी पसरली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून **हालेबीड** येथील देवळें पाहण्यास गेलों. गांवा-पासून देवळें सुमारें अर्ध्या मैलावर आहेत. देवळाच्या बाहेरील भागावर एकावर एक दगडांचे थर असून त्यांवर हजारों हत्ती कोरलेले आहेत. तसेंच भारत, भाग-वत इत्यादि पुराणांतील कथाप्रसंगांचींही चित्रेंही कोरलीं आहेत. हीं दोन देवळें बांधण्याचें काम सुमारें ८६ वर्षें चाललें होतें; परंतु मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें तें काम सोडून द्यावें लागलें. **हालेबीडचीं** हीं दोन्हीं देवळें **शंकराचीं** आहेत, ही गोष्ट त्यांजपुढें असलेल्या नंदीवरून लक्षांत येतें. देवळांत मूर्ति नाहींत. बराच वेळ दोन्हीं देवळें बंद असतात, म्हणून त्यांत पाकोळ्यांची वस्ती असते. ह्या देवळांत कारागिरांनीं आपल्या कौशल्याची शिकस्त केलेली आढळून येते. सर्व मूर्ति रेखीव व प्रमाणशुद्ध आहेत. ह्या देवळांच्या तोडीचीं देवळें **हिंदुस्था-नांत** दुसरीं नाहींत, इतकें सांगितलें असतां ह्यांच्या मोठेपणाची वाचकांस कल्पना येईल. देवळांच्या बाहेर पडलों व डाव्या हाताच्या रस्त्यानें **जैन** लोकांच्या देवळाचा मार्ग धरला. जातांना उजव्या हातास **हालेबीडचा डाकबंगला** लागला. ह्या डाकबंगल्याचा उपयोग श्रीमंत प्रवासी करतात. सुमारें एक फर्लांग चालून गेल्यानंतर २ जैनांचीं देवळें लागलीं. देवळें बाहेरून बंद होतीं. परंतु देवळाच्या जवळच थोडीशी वस्ती आहे. तेथें चवकशी करितां रखवालदाराचा तपास लागला. त्यानें देवळें उघडून दाखविलीं. आंतील खांब

अत्यंत गुळगुळीत व तकतकीत दगडाचे तयार केले आहेत. देवळांत २ पुरुष उंचीचे जैनांच्या देवाचे नग्न पुतळे उभे केले आहेत. **जैनांची** देवळें पाहून तसेंच पुढें गेलों तों आणखी एक देवालय लागलें. त्यांतही कलाकुसरीचें काम भरपूर आहे. देऊळ पाहून जवळच्या तलावावर गेलों. प्रातर्विधि उरकले व खाणावळींत परतलों. खाणावळींत जेवून पुढें जाण्याचा विचार होता, परंतु कॉफीपान करतों न करतों तोंच एक मोटार **बनावर** येथें जाणारी येऊन थडकली. तिचा आश्रय करून **हालेबीडची** रजा घेतली व सुमारें ११ वाजतां **बनावर** येथें येऊन दाखल झालों. **हालेबीड**पासून **बनावर** १८ मैल आहे. माणशीं १२ आणे भाडें पडलें. **बनावर** हें सदर्न मराठा रेल्वेच्या **पूना** ते **बंगलोर** फाट्यावरील एक स्टेशन आहे. गांव साधारणतः १५।२० घरांचेंच आहे. परंतु स्टेशनवर ब्राह्मणाचें कॉफीचें दुकान व खाणावळ आहे. खाणावळींत फराळ वगैरे उरकून २॥। वाजतां गाडींत बसलों. गाडी बिरूरकडे निघाली. वाटेनें सारख्या नारळी-पोफळीच्या बागा लागत होत्या. शेतकऱ्यांचें शेतकाम चालूंच होतें. प्रदेश हिरवागार असल्यामुळें उन्हाची वेळ असूनही वेळ तेव्हांच निघून गेला. सुमारें ३॥। वाजतां **बिरूर** स्टेशनवर येऊन पोहोंचलों. येथें **शिमोग्यास** जाण्याकरितां गाडी बदलावी लागते. **शिमोग्याची** गाडी ४-१० वाजतां सुटली. **शिमोग्याची शिमोगा** व **शिमोगा टाउन** अशीं दोन स्टेशनें आहेत. आम्ही चुकून **शिमोगा** स्टेशनला उतरलों. येथेंच आम्हांस गेरसप्पा येथें जाणाऱ्या मोटारच्या एजंटानें गाठलें व धर्मशाळेंत तुमची चांगली सोय होणार नाहीं, हॉटेलमध्येंच तुम्हास आतां फुकट मोटारींतून नेऊन पोहोंचवितों; उद्यां मात्र आमच्या मोटारीनें गेरसप्पास चला, असें सांगितलें. आम्हांसही एकवार हॉटेलचा पाहुणचार घ्यावयाचा होता; अर्थात् आम्ही तें कबूल केलें. मात्र त्यानें आमची १ तास खोटी करून आम्हांस मॉडर्न हिंदू हॉटेलमध्यें आणून सोडलें. दर बेताचे असल्यामुळें आम्ही तेथें राहाणें पसंत केलें. रात्रीचें खोलीभाडें फक्त ८ आणे पडलें. त्यांत दिवा, खुर्ची, टेबल, २ खाटा वगैरे सर्वांचा समावेश झाला. भोजनास वेळेचे फक्त ५ आणे दर होता. खोलींत सामान टाकून **शिमोगा** शहर पाहाण्यास बाहेर पडलों. शहर बरेंच मोठें आहे. हें **तुंगा** नदीच्या कांठांवर बसलें आहे. शहराची लोकसंख्या सुमारें १५ हजार आहे. हें जिल्ह्याचें ठिकाण असल्यामुळें बरींच मोठमोठीं ऑफिसें, शाळा वगैरेंच्या इमारती येथें आहेत. गांवांत चहाकॉफीचीं बरींच दुकानें आढळलीं. त्यांतील विशेष

म्हणजे प्रत्येक दुकानांत फोनोग्राफ गिऱ्हाइकांच्या करमणुकीकरितां वाजत होता. रात्रीं भोजन करून झोंपीं गेलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून पोस्टाची चवकशी केली. कारण घरून C/o. पोस्टमास्तर **शिमोगा** ह्या पत्त्यावर पत्रें मागविलीं होतीं. पोस्ट ऑफिस हॅाटेलच्या समोरच असल्यामुळें विनत्रासानें पत्रें मिळालीं. माणशीं २॥ रु. भाडें देऊन **गैरसप्प्याच्या** मोटारींत बसलों. मोटार सुमारें ८ वाजतां सुटली. मोटारनें सुमारें ११ मैल प्रवास केल्यानंतर **अयानूर** नांवाचें गांव लागलें. हें तालुक्याचें ठिकाण आहे. येथून पुढें ४ मैलांवर **कुमशी** नांवाचें गांव लागलें. हें म्हैसूर स्टेट रेल्वेच्या बिरूर **शिमोगा** फाट्यावरच आहे. अर्थात् पायीं प्रवास करणारास येथपर्यंत गाडीनें येऊन पुढें प्रवास पायांनीं सोइस्कर पडेल. ह्या ठिकाणापासून सुमारें १० मैलांवर मॅंगॅनिजच्या खाणी आहेत. व **शिमोग्यापासून** त्या खाणीपर्यंत खाणीचा धंदा करणाऱ्या कंपनीनें एक लहानशी रेल्वे स्वतःच्या मालकीची बांधली आहे. **कुमशी**पासून पुढें दाट जंगलास सुरवात झाली. रस्ते वगैरे मात्र चांगले बांधलेले आहेत. **कुमशी**पासून १० मैलांवर **अनंतपूर** नांवाचें मोठें गांव लागलें. ह्या गांवापासून घाट चढण्यास सुरवात होते. **अनंतपूर**पासून १५ मैलांवर असलेल्या **सागर** नांवाच्या गांवीं आम्ही सुमारें ११ वाजतां येऊन सुखरूप पोहोंचलों. **शिमोगा** ते सागर अशीच मोटार सर्व्हिस आहे. दुसरी मोटारसर्व्हिस **सागर** ते **शिरसी** आहे. त्या मोटारनें आम्हांस पुढें जावयाचें होतें, म्हणून **सागरला** आम्हांस ३ तास थांबावें लागलें. तेवढ्या वेळांत गांव पाहून घेतलें.

**सागर** हें सुमारें ५००० लोकवस्तीचें गांव आहे. गांवास म्युनिसीपॅलिटी असून गांव स्वच्छ आहे. **सागर**जवळ असलेल्या जंगलांत चंदनाचीं झाडें पुष्कळ असल्यामुळें येथून पुष्कळ चंदनी लाकूड, त्याचप्रमाणें चंदनावर कोरीव काम करून तयार केलेल्या वस्तु बाहेरगांवीं रवाना होतात. हें ठिकाण घाटमाथ्यावर असल्यामुळें अरबी समुद्रावरून येणारे थंड वारे ह्या गांवावरून वाहात जातात. म्हणून येथील हवा अत्यंत आल्हाददायक असते. गांवांत खाणावळी बऱ्याच आहेत. आम्हांस आमच्या मोटारवाल्यानें **बंगलोर** हिंदु हॅाटेल नांवाच्या खाणावळींत उतरून ठेविलें. भोजनाचा दर माणशीं अवघा ४ आणे असून व्यवस्था त्या मानानें उत्तम होती. सुमारें २ वाजतां **गैरसप्पाच्या** मोटारींत बसलों. येथून धबधबा सुमारें २० मैल आहे. आपण

ज्यास **गैरसप्पा धबधबा** ह्या नांवानें ओळखतों, त्यास **म्हैसूर**कडील लोक **जोग धबधबा** ह्या नांवानें ओळखतात. कारण हा **धबधबा गैरसप्पा** गांवापासून १८ मैल अंतरावर आहे. **जोग** गांवापासून १॥ मैलावर आहे व **शिरसीस** जाणारी मोटार धबधब्यास जाणाऱ्या उतारूंस वाटेंत **शरावती** नदीच्या एका आंगास सोडून पुढें जाते. अलीकडचा भाग ब्रिटिश हद्दींत असून पलीकडचा भाग **म्हैसूर** हद्दींत आहे. दोन्हीं बाजूंस डाकबंगले आहेत, परंतु ब्रिटिश हद्दींत असलेल्या डाक बंगल्यावरून धबधब्याची शोभा चांगली दिसत नाहीं म्हणून बहुतेक सर्व प्रवासी धबधबा पाहाण्याकरितां **म्हैसूर**हद्दींत जातात. त्याकरितां नदी ओलांडावी लागते. अलीकडच्या तीरावर **जोग** नांवाचें ५।७ घरांचें एक खेडेगांव आहे. तेथून सामानाकरितां मजूर घ्यावे लागतात. कारण पलीकडल्या तीरावर वस्ती नाहीं व होडींतून उतरल्यानतर डाक बंगल्यापर्यंत सुमारें १॥ मैल अंतर आहे. एका बोजाचें ८ आणे पडले, परंतु मजूर मिळाले हेंच विशेष. स्वतंत्र मोटार असल्यास ती तराफ्यांतून दुसऱ्या आंगास नेतां येते. **शरावती** नदीचें पात्र फारसें रुंद नाहीं, तरी सभोंवतीं गर्द झाडीच्या असलेल्या डोंगरांच्या मधून ती वाहात असल्यामुळें देखावा फार रमणीय दिसतो. सुमारें ४॥ वाजतां **डाक बंगल्याजवळ** येऊन पोहोंचलों. **डाक बंगल्याचें** रोजचें भाडें ४।५ रुपये असल्यामुळें त्याचा आश्रय करणें कठीण असतें. जवळच मध्यम स्थितींतील लोकांस उतरण्याकरितां रोजीं १ रु. भाड्याच्या खोल्या संस्थाननें बांधल्या आहेत. त्यांचा बरीच मंडळी आश्रय करितात. आम्ही मात्र उघड्या व्हरांड्यांतच उतरलों. कारण आम्हांस **बदरी-नाथच्या** यात्रेंत उघड्यावर निजण्याची संवय झाली होती. येथें वाघ येतो म्हणतात, परंतु तो आमच्या भेटीस त्या दिवशीं कांहीं आला नाहीं. बाजूंस कांहीं लहान झोपड्याही होत्या. परंतु त्यांचा उपयोग करण्यापेक्षां आम्हीं उघडा व्हरांडाच जास्त पसंत केला. येथें एक नुकतीच ब्राह्मणाची खाणावळही उघडली आहे. मात्र सर्व जिनसांची किंमत दुप्पट होती. खाणावळींत पोहोंचल्याबरोबर थोडासा फराळ करून धबधबा पाहाण्यास गेलों.

ह्या ठिकाणीं **शरावती** नदी ८०० फुटांवरून खालीं उडी घेते. तिचे लहानमोठे ४ प्रवाह खालीं पडतात. त्यांच्या आवाजानें कानठळ्या बसून जातात. नदीचें पाणी खडकावर हापटत हापटत पडत असल्यामुळें त्याचे पांढरे तुषार बनतात व पाणी पडत नसून दुधाच्याच धारा पडत आहेत कीं काय

असा भास होतो. धवधवा कितीही वेळ पहात बसलें तरी तृप्ति होत नाहीं. आरंभीं बराच वेळ एकाच ठिकाणावरून धबधबा पाहाण्यांत घालविला. नंतर इकडेतिकडे फिरून निरनिराळ्या ठिकाणाहून धबधबा कसा दिसतो तें पाहूं लागलों. तों रहदारी बंगल्यासमोरून खालीं नदीच्या पात्राकडे जाणारी वाट दिसली. तेव्हां खालीं जाऊन धवधवा कसा दिसतो तें पाहाण्याकरितां उतरण्यास सुरवात केली. १ मैल उतरलों तरी तळ येईना. सूर्य अस्तास गेला. तेव्हां खालीं जाण्याचा विचार रहित करून परतलों. आल्याबरोबर जर ती वाट सांपडली असती, तर खालीं जाऊन आलों असतों. ह्या वाटेनें सुमारें १॥ मैल उतरल्यानंतर तळ लागतो असें समजलें. वरती आल्यानंतर पोटपुजा करून व्हरांड्यांत अंथरुणें पसरलीं. व्हरांड्यांतून धवधव्याची शोभा फार चांगली दिसत होती. शिवाय त्या दिवशीं पौर्णिमा असल्यामुळें स्वच्छ चांदणें पडलें होतें. चंद्रप्रकाशामुळें मूळच्या शोभेंत भरच पडली होती. धवधव्याकडे पाहातां पाहातां केव्हांच झोंप लागली. चोहों बाजूंनीं किर्र झाडी असलेल्या जंगलांत हें ठिकाण असल्यामुळें पहाटे पहाटे मात्र बरीच थंडी वाजली. परंतु जागा झाल्यामुळें धवधवा पाहाण्यास जास्त वेळ मिळाल्याबद्दल आनंदही वाटला. कारण अशा ठिकाणीं वारंवार कोण जातो. सकाळीं उठून नदीची वाट धरली. कारण येथें पाण्याचें दुर्भिक्ष आहे. सामान पाठीवर मारून नदी गांठली. मग यथास्थित सर्व विधि उरकले व होडीनें पलीकडच्या तीरास आलों. लवकर येण्याचा हेतु जर **सागरहून** सकाळींच एकादी मोटार आली तर भोजनास **शिरसीसच** जाऊं असा होता. परंतु तपास करितां मोटार ३ वाजल्याशिवाय मिळावयाची नाहीं असें समजलें व जोग गांवांत एकही दुकान नसल्यामुळें स्वयंपाकाकरितां सामान मिळविणें कठीण होतें. इतक्यांत एक मोटार आली. मोटारवाला म्हणाला येथून ३ मैलांवर असलेल्या **माविनगुंडी** गांवास माझ्या मोटारींतून चला. तेथें जेवण तयार करून आराम करा. मग ३।४ वाजतां आपण शिरसीस जाऊं. म्हणून **माविनगुंडी** येथें आलों. हें ठिकाण ब्रिटिश हद्दींत आहे. येथें एक मराठी जाणणारा पोलिस शिपाई भेटला. बाकीचे सर्व लोक कानडी जाणणारे, अर्थात् आम्ही त्यांचे गांववालेच बनलों. त्यानें धर्मशाळा दाखवून भांडीं वगैरे दिलीं. गांवांत एक किराण्याचें दुकान असून हॉटेलही होतें. धर्मशाळेंत स्वयंपाक बनविला. एक स्वच्छ पाण्याचा पाट डोंगरावरून बांधून आणून त्याचें पाणी धवधव्यासारखें सोडून दिलें आहे. त्यामुळें स्नानाची वगैरेही चांगली

सोय झाली. ह्या गांवाहून एक रस्ता १६ मैलांवरील **गैरसप्पा** नांवाच्या गांवीं जातो. परंतु **गैरसप्पा**कडे जाणारा रस्ता लहान असल्यामुळें त्यावरून ८ पेक्षां जास्त माणसांच्या मोटारलॉऱ्या चालविण्याची परवानगी नाहीं, म्हणून आम्हांस शिरसीस जावें लागलें. पहिला आमचा बेत गैरसप्पास जाऊन तेथून **होनावर** बंदरास जावें व **होनावराहून** बोटीनें मुंबई गांठावी, असा होता तो बदलावा लागला. जंगली प्रदेश ओलांडीत ओलांडीत सुमारें ७ वाजतां **शिरसीस** येऊन दाखल झालों.

**शिरसी** हें गांव मोठें असून तालुक्याचें ठिकाण आहे. येथून **हुबळीस** मोटारी जातात. माणशीं २ रु. भाडें पडतें. **हुबळी** येथून ६३ मैल आहे. रात्रीं मोटार-एजंटाच्या ऑफिसांत वस्ती केली. ह्या गांवांत चहा कोणत्याही हॉटेलांत विकत मिळत नाहीं. सर्वत्र कॉफीच मिळत होती. दर मात्र चहा प्रमाणेंच ३ पैसे कप होता. इकडील भागांत कायदेभंगाची चळवळ फार जोरांत असलेली आढळली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८ च्या सुमारास शिरसी सोडली. येथून **कुमठा** बंदर ३८ मैल आहे. मोटार सुमारें ११ वाजतां **कुमठें** गांवांत शिरली. वाटेंत एके ठिकाणीं वेलदोडे २४ तोळ्यास आठ आणे भावानें खरेदी केले. कुमठ्याहून **मुंबईस** जाणारी मालाची बोट दुपारीं १२ च्या पुढें बंदरांत येते, असा तपास शिरसीस लागला होता. परंतु आम्ही गेलों त्या दिवशीं बोट-११ लाच बंदरांत आली होती. कुमठें बंदरास धक्का नसल्यामुळें बोट लांब समुद्रांत उभी राहाते व धक्क्यावरून माणसें घेऊन मचवा सुटतो. मोटारींतून उतरल्याबरोबर बोट आल्याची बातमी लागल्यामुळें मजुराच्या खांद्यावर सामान देऊन तसाच बंदराचा रस्ता पकडला. खाण्यापिण्याच्या भानगडींत पडावयास सवडच नव्हती. बंदरावर जातों तों मचवा सुटून गेला होता. सरते शेवटीं १ रु. कबूल करून एक स्वतंत्र होडी करून बोट गांठली. पोटांत कावळे ओरडत होते, परंतु बोटींत बसल्यानंतर ४८ तास तींत बसून राहावयाचें होतें. दगदगीचा प्रवास नव्हता म्हणून थोडें बरें वाटलें. ही बोट मालाची होती. **मंगलोरहून** सोमवार, बुधवार, शुक्रवार मालाच्या बोटी सुटतात व त्या वाटेंतील महत्त्वाच्या बंदरांतून माल घेतघेत **मुंबई** गांठतात. ह्या दिवसांत समुद्र शांत असल्यामुळें प्रवास फार सुखकर झाला. बोटीवर सर्व कामगार मुसलमान होते. आम्हांस स्वराज्य मिळाल्यानंतर सर्व खात्यांत काम करावें लागेल. परंतु जेथें तेथें आमचा धर्म आड येत आहे. कारण बोटीवर काम करण्यास गेलों

तर खाण्याची व्यवस्था काय ? मुसलमानाच्या हातचें कसें खाऊं ? त्यामुळें आम्ही सर्व जगाच्या मागें पडलों आहों. आमच्या देशास लागलेला विटाळाचा रोग नाहींसा करणारा कोणी महात्मा उत्पन्न होईल काय ? असो. संध्याकाळीं ६ वाजतां बोट कारवार बंदरांत आली. येथें बोटीचा ८ तास मुक्काम होता, म्हणून गांवांत गेलों. गांवभर फिरून बोटींत परतलों. सकाळीं बोट **मार्मगोवा** बंदरांत शिरली. ह्या बंदरांत रात्रीची बोट घेत नाहींत म्हणून, **कारवारला** बोट जास्त वेळ थांबली. येथें बोटीचा मुक्काम ५ तास होता, म्हणून उतरल्या-बरोबर स्टेशनवर गेलों. स्टेशन बोटीच्या धक्क्यास लागूनच आहे व आग-गाडीनें **वास्कोडीगामा** नांवाच्या ठिकाणीं गेलों.

१९२५ सालीं गोंवें प्रांतांत प्रवास केला होता. परंतु त्या वेळीं **मार्म-गोंवें** पाहण्यास सवड सांपडली नाहीं. **पणजीपेक्षां मार्मगोंवें** लहानच आहे. फक्त ह्या गांवास महत्त्व, येथें **मुंबईप्रमाणें** बोट धक्क्यास लागते व बोटीवरून माल एकदम आगगाडीच्या डब्यांत टाकितां येतो ह्या कारणानेंच आलें आहे. गांवांत सारस्वतांच्या खाणावळी आहेत. ब्राह्मणाची खाणावळ विचारिली असतां लोक सारस्वताची खाणावळ दाखवितात.परंतु खाणावळींत माशांचे पदार्थ तयार करितात म्हणून गोंवें प्रांतांत भटाची खाणावळ विचारावी. तेथें मात्र निर्मांस पदार्थ मिळतात. **मुरगांवला** (मार्मगोवा) भटाची खाणावळ एकच असून ती बंदरावरच आहे. गांवांत नारळीचीं वगैरे झाडें पुष्कळ असल्यामुळें रस्त्यानें चालतांना उन्हाचा त्रास होत नाहीं. जातांना गाडीनें जाऊन शहराची मजा पहात पहात येतांना चालत आलों. १२ वाजतां बोट सुटली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ९ वाजतां **मुंबईस** येऊन दाखल झालों व तिसऱ्या दिवशीं सुप्रभातीं पुणें गाठलें. एकंदर प्रवासास पंधरा दिवस लागले. प्रवास करण्याची संधि मिळवून दिल्याबद्दल श्री. **नानासाहेब जोग** ह्यांचें व तो निर्विघ्नपणें पार पाडल्याबद्दल त्या जगन्नि-यंत्या परमेश्वराचे आभार मानून हें प्रवासवर्णन पुरें करतों.

# म्हैसूरसंबंधीं कांहीं उपयुक्त माहिती.

महिषासुरमर्दिनी **चामुंडी देवी** हिनें ह्या प्रांतांत राहाणाऱ्या **महिषासुर** नांवाच्या राक्षसाचा वध केला, म्हणून ह्या प्रांतास त्या राक्षसाच्या नांवावरून **म्हैसूर** असें नांव पडलें.

**म्हैसूर** हें संस्थान **निलगिरी** व **सह्याद्री** ह्यांच्यामध्यें असल्यामुळें बहुतेक प्रदेश डोंगराळ आहे. त्यामुळें त्यांत जंगलें बरीच असून खनिज व उद्भिज संपत्ति भरपूर आहे. म्हैसूरसंस्थानच्या भरभराटीस एक मोठा अडथळा म्हणजे म्हैसूरसंस्थानास बंदर नाहीं. ब्रिटिशांनीं १७९९ सालच्या **टिपूशीं** झालेल्या शेंवटच्या युद्धांत नेमका समुद्र किनारा आपल्याकडे ठेवून बाकीचें राज्य **कृष्णराजाच्या** ताब्यांत दिलें तेंही त्यांनीं मोठ्या मेहेरबानीनें त्या राजाच्या स्वाधीन केलें असें **इंग्रजांनीं** शाळांकारितां मंजूर केलेले इतिहास सांगतात. परंतु खरी परिस्थिति अशी होती कीं १७९२ सालच्या युद्धाप्रमाणें १७९९ सालच्या युद्धांतही **इंग्रजांनीं टिपूशीं** लढतांना **मराठे** व **निजाम** ह्यांची मदत घेतली होती. (तो भाग नेमका इतिहासांतून गाळला आहे) अर्थात् टिपू मारला गेल्यानंतर जर राज्य खालसा केलें असतें तर त्याचे तीन भाग करून एक एक भाग **निजाम** व **मराठे** यांस द्यावा लागला असता, व एक तृतियांशच भाग **इंग्रजांस** मिळाला असता. त्यापेक्षां इंग्रजांनीं सर्वच राज्य आपल्या ताब्यांत येण्यासारखी युक्ति योजिली. पूर्वीच्या हिंदूराजाचा वारस शोधून काढून त्याच्या ताब्यांत राज्य दिलें. अर्थात् **मराठे** व **निजाम** ह्यांस कांहींच तक्रार करितां आली नाहीं व पुढें १८३१ मध्यें राजास पेनशन करून देऊन इंग्रजांनीं तें राज्य आपल्याकडे चालविण्याकरितां घेतलें. तें त्यांच्याकडे ५० वर्षें वहिवाटीस होतें व तें तसेंच आजपर्यंत राहिलेंही असतें; परंतु १८८० सालीं **इंग्लंडांत** राजकीय घडामोडी होऊन उदार पक्षाचा **लार्ड रिपन** हा व्हाइसरॉय हिंदुस्तानांत आल्यामुळें त्यास लाजेकाजेस्तव तें राज्य **म्हैसूरच्या** राजास परत द्यावें लागलें व तेव्हांपासून राज्याची सारखी सुधारणा होत आहे.

**म्हैसूर** संस्थानांत सोनें, दगडी कोळसा, लोखंड इत्यादिकांच्या खाणी बऱ्याच आहेत. शिवाय चुन्याचे, दगड, इमारतीस लागणारे सर्व प्रकारचे दगड विपुल मिळूं शकतात. इमारतीस लागणारें लाकूडही जंगलांत पुष्कळ मिळतें. चंदनाच्या झाडांची पैदास बरीच होते म्हणून **म्हैसूर**मध्यें चंदनी तेल, अत्तर वगैरे काढण्याचे कारखाने पुष्कळ आहेत. जंगलांत सर्व प्रकारचें लाकूड तयार होत असल्यामुळें लाकडाची खेळणीं तयार करण्याचेही बरेच कारखाने आहेत.

**म्हैसूरच्या** राजानें उत्पन्नाच्या $\frac{1}{2}$ पेक्षां जास्त खर्च खाजगीकरितां करूं

नये असें बंधन **इंग्रजांनीं** राज्य त्याच्या स्वाधीन करितांनाच त्याच्यावर घातल्यामुळें राज्यांतील लोकांचा बराच पैसा अकारणीं खर्च व्हावयाचा थांवला आहे. सध्यां राजास सल्लामसलत देण्याकरितां एक **लेजिस्लेटिव्ह असेंब्ली** नांवाची लोकसभा आहे. परंतु तिजला फारसे अधिकार नाहींत. राजा हिंदू असून त्यास चालू परिस्थितींत हिंदू दिवाण मिळाला नाहीं ही मात्र आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे. दिवाण मुसलमान असल्यामुळें राज्यांत मुसलमानांचा थोडा वरचष्मा आहे. लोकांनीं दिवाण हिंदू नेमण्याबद्दलची खटपट केली पाहिजे. शेजारीं **निजामच्या** राज्यांत राजा मुसलमान म्हणून मुसलमानांस सवलती इंग्रजांच्या राज्यांत ते अल्पसंख्याक व भांडण उपस्थित करण्यास उपयुक्त म्हणून त्यांस सवलती, व हिंदू राज्यांत दिवाण मुसलमान म्हणून त्यांस सवलती, एकूण हिंदूंचा सर्व बाजूंनीं कोंडमारा होत आहे ही परिस्थिती बदलून घेण्याच्या उद्योगास नेटानें हिंदू केव्हां लागणार ? असो. आतां **म्हैसूर**मधील कांहीं प्रसिद्ध स्थळांची माहिती थोडक्यांत सांगतों.

**द्रोणागिरी**—ही एक मोठी पर्वतांची ओळ आहे. ह्या पर्वतास मुसलमान लोक बाबाबदन म्हणतात ह्या पर्वतावर दत्तात्रयाचें एक स्थान आहे. त्या ठिकाणीं जावयास बिरूर स्टेशनवर उतरावें लागतें. जातांना वाटेंत कॉफीचे मळे लागतात. हें ठिकाण समुद्रसपाटीपासून सुमारें ६२०० फूट उंचीवर आहे. येथील हवा आल्हादकारक आहे.

**भद्रावती**—बिरूरहून शिमोग्यास जातांना वाटेंत हें स्टेशन लागतें. ह्या ठिकाणीं **म्हैसूर**संस्थाननें १९२३ सालापासून चालविलेला लोखंड तयार करण्याचा कारखाना आहे. ह्या ठिकाणीं जमिनीच्या पोटांत लोखंडाचा मोठा सांठा आहे. त्याचप्रमाणें लोखंड तयार करण्यास लागणारा चुना ह्या ठिकाणीं भरपूर सांपडतो. लोखंड वितळविण्यासाठीं लाकूड लागतें. तेंही येथील जंगलांत भरपूर मिळतें. **भद्रावती**पासून २५ मैलावर कमानगुंडी नांवाचें ठिकाण आहे. तेथून अशुद्ध स्थितींतील लोखंड येथें आणून शुद्ध करण्यांत येतें. हल्लीं रोज जवळ जवळ १०० टनापर्यंत लोखंड तयार होतें. त्याचप्रमाणें लोखंड वितळविण्यासाठीं जाळण्यांत येणाऱ्या लाकडापासून निरनिराळीं रासायनिक द्रव्यें तयार करण्यांत येतात.

**वाणीविलास सागर**—**चितळदुर्ग** टेकड्यांतून ज्या ठिकाणाहून **वेदावती**नदीचा उगम झाला त्याठिकाणीं सुमारें १३३० फूट लांबीचा बंधारा बांधून हा तलाव तयार केला आहे. ह्या तलावाचें क्षेत्रफळ ३४ चौरस मैल असून ३००० कोटी घनफूट पाण्याचा साठा ह्या तलावांत होऊं शकतो. ह्या तलावानें २५,००० चौरस मैल प्रदेश सुपीक झाला आहे.

**मेलकोट**—हें ठिकाण **श्रीरंगपट्टण** तालुक्यांत आहे. गवताचें सुंदर पंखे व चांगल्या प्रकारचें कापड ह्या ठिकाणीं तयार होतें. विशेषतः हें ठिकाण गोपी-

चंदनाच्या डोंगरामुळें प्रसिद्ध आहे. ह्या ठिकाणाहून गोपीचंदन सर्व **हिंदुस्थान**-भर रवाना होतें.

**नंदिदुर्ग--बंगलोरच्या** उत्तरेस ३१ मैलांवर **चिकबालापूर** तालुक्यांत हा एक इतिहासप्रसिद्ध किल्ला आहे. ह्या किल्ल्यावर गर्द झाडीनें वेष्टित व चारी बाजूंनीं दगडी पायऱ्या बांधलेला अमृतसरोवर नांवाचा तलाव आहे. हा किल्ला हैदरापूर्वीच्या हिंदूराजांनीं बांधला व तेथें राजधानी नेली परंतु **हैदर** व **टिपू** ह्यांनीं ह्या किल्ल्याचा उपयोग कैदी ठेवण्याकडे केला ! विशेषतः टिपूचे युरोपियन कैदी ह्या किल्ल्यावर असत. ह्या किल्ल्यावर **हैदर** व **टिपू** ह्यांच्या नांवाच्या कैद्यांचा कडेलोट करण्याच्या जागा आहेत त्या ठिकाणाहून कैद्यांना खालील खोल दरींत लोटून देत असत. पेन्नार, पालर, अरकावती, व चित्रवती, ह्या नद्यांचे प्रवाह ह्या किल्ल्याच्या खालून वाहातात. उन्हाळ्यांतही हवा थंड असते म्हणून बरेच लोक येथें हवा खाण्याकरितां जातात.

**हरिहर--बंगलोरपुना** फाट्यावरील हें पहिलें स्टेशन **धारवाड** व **म्हैसूर** ह्यांच्या सरहद्दीवर आहे. हें ठिकाण **तुगंभद्रा**नदीच्या कांठीं आहे. इ. स. १२२३ मध्यें बांधलेलें **हरिहरेश्वर** नांवाचें एक देऊळ येथें आहे. देवळाचें काम पाहाण्यासारखें आहे. **तुगंभद्रा**नदीवर एक गाड्यांकरितां व दुसरा रेल्वेकरितां असे दोन मोठे पूल आहेत. बरेच यात्रेकरू हें ठिकाण पाहाण्याकरितां उतरतात.

**शिवगंगा--बंगलोर** जिल्ह्यांतील **नेलामंगला** तालुक्यांत हें समुद्रसपाटीपासून ४५५९ फूट उंचीवर असलेलें एक पवित्र क्षेत्र आहे. ह्याचा आकार पूर्वेस बैलासारखा, पश्चिमेस गणपतीसारखा, उत्तरेस सापासारखा व दक्षिणेस शिवाच्या लिंगासारखा आहे. ह्या ठिकाणाहून काशी जितकीं योजनें दूर आहे तितक्याच पायऱ्या पायथ्यापासून देवळापर्यंत आहेत. म्हणून ह्या ठिकाणास दक्षिण काशी असें नांव आहे. व पुष्कळ यात्रेकरू या ठिकाणीं यात्रेकरितां येतात.

**सोमनाथपुरा--म्हैसूर**पासून २७ मैलांवर **कावेरी**नदीच्या कांठांवर **जकनाचारी** नांवाच्या सुप्रसिद्ध कारागिरानें बांधलेले चेन्नाकेशव नांवाचें विष्णूचें मंदीर या ठिकाणीं आहे. ह्याच कारागिरानें **हालेबीड** व **बेलूर** येथील देवालयें बांधलीं. हें देऊळ हालेबीड इतकें मोठें नसलें तरी बांधकाम अत्यंत प्रेक्षणीय आहे.

**सोराब**—शिमोग्यापासून ५४ मैलांवर एक तालुक्याचें ठिकाण आहे. चंदनाच्या लाकडावर काम करण्यांत अत्यंत कुशल अशा गुडिगार नांवाच्या कारागिरांची वस्ती येथें आहे; त्यांना ज्या प्रकारची वस्तु चंदनी लाकडाची तयार करण्यास सांगावी त्या प्रकारची ते तयार करून देतात. नुकतेच

कांहीं लोकांस **बंगलोरला** नेऊन त्यांजकडून मुलांना चंदनावरील खोद-काम शिकविण्याचा उपक्रम संस्थानाकडून झाला आहे.

**श्रावणबेलागोला**—हें एक हासन जिल्ह्यांत चन्नारायपट्टण तालुक्यांत दोन टेकड्यांच्या मध्यें वसलेलें लहानसें गांव आहे. जैन लोकांचे मुख्य गुरु ह्याच ठिकाणीं राहतात. समुद्रसपाटीपासून ह्या ठिकाणाची उंची ३२५० फूट आहे. गांवापासून ४०० फूट उंचीवर डोंगरावर **गोमतेश्वर** नांवाची जैनांच्या देवाची एक ५७ फूट म्हणजे सुमारें १० पुरुष उंचीची दगडी मूर्ति आहे. सुमारें १००० वर्षांपूर्वी अरिशेनेमी नांवाच्या कारागिरानें ही मूर्ति तयार केली असा शोध लागला आहे. मूर्तीचा आकार साधा असून ती नग्न आहे. ही मूर्ति घडविण्यास किती कष्ट करावे लागले असतील ह्याची कल्पनाच करवत नाहीं. मूर्ति डोंगरा-च्याच एका भागाची कोरली आहे कीं दुसरीकडे तयार करून येथें आणून बस-विली आहे ह्याचा निर्णय करणें कठीण पडतें. परंतु येवढी मूर्ति डोंगरावर चढ-विणें अशक्य असल्यामुळें ती डोंगराच्या भागाचीच कोरलेली असावी असें मानावें लागतें. जगांत **इजिप्त**शिवाय दुसऱ्या कोठेंही अशा तऱ्हेचें कोरीव काम पाहण्यास सांपडत नाहीं. मूर्ति मोठी असूनही काम अगदीं प्रमाणशुद्ध आहे असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे.

**श्रृंगेरी—जगद्गुरु शंकराचार्यांचे** हिंदुस्तानांत ४ मठ आहेत, त्यांत **श्रृंगेरीचे** शंकराचार्यांचा मठ मुख्य आहे. श्रृंगेरीच्या आसपासच्या बऱ्याच भागाची मालकी शंकराचार्यांकडेच आहे. गांवांत ब्राम्हणांची बरीच वस्ती आहे प्रत्येक ब्राम्हणाचें घर एक एक देऊळच आहे. इतकीं देवळें येथें आहेत. मुख्य देऊळ **शारदंबेचें** आहे. देवीची मूर्ति शुद्ध सोन्याची असून देवळाच्या आवा-रांतच **शंकराचार्यांची** मुख्य गादी आहे. देवळासभोंवतीं मोठा कोट असून
त्यावर पुष्कळ मूर्ति कोरल्य व्यासांची असून दुसरी
श्री. शंकराचार्यांची आहे व ा शिक्षण देत आहेत
असा देखावा दाखविला आ तेल लावीत असल्या-
मुळें त्या तकतकीत व नव्य **ानदीच्या** कांठीं एक
शंकराचार्यांचें देऊळ आहे. र्य सदेह स्वर्गास गेले
असें मानतात.

REFBK-0004570
REFBK-0004570
4500